नागपूर महानगरपालिकेच्या दि.08.05.2017 सोमवार रोजी सकाळी 11.00 वाजता दिनांक 20.4.2017 रोजी स्थगित झालेल्या सर्व साधारण सभेतील विषयपत्रिकेवरील विषयावर राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **उपमहापौर** |
| 3. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 4. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 5. | 1 | क | प्रमिला प्रितम मंथरानी | सदस्या |
| 6. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 7. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 8. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 9. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 10. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 11. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 12. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 13. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 14. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 15. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 16. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 17. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 18. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 19. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 20. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 21. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 22. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 23. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 24. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 25. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 26. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 27. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 28. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 29. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 30. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 31. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 32. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 34. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| 35. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 36. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 37. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 38. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 39. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 40. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 41. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 42. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 43. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 44. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 45. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 46. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 47. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 48. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 49. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 50. | 14 | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| 51. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 52. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 53. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 54. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 55. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 56. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 57. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 58. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 59. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 60. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 61. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 62. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 63. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 64. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 65. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 66. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 67. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 68. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 69. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 70. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 71. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 72. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 73. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 74. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 75. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 76. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| 77. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 78. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 79. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 80. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 81. | 23 | अ | कांता राधेश्याम लारोकर | सदस्या |
| 82. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 83. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 84. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 85. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 86. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 87. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 88. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 89. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 90. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 91. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 92. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 93. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 94. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 95. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 96. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 97. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 98. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 99. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 100. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 101. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 102. | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 103. | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 104. | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 105. | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 106. | 30 | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्य |
| 107. | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 108. | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 109. | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 110. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 111. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 112. | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 113. | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 114. | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 115. | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |
| 116. | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| 117. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| 118. | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 119. | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 120. | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 121. | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 122. | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 123. | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 124. | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 125. | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 126. | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 127. | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 128. | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 129. | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 130. | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 131. | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 132. | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 133. | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 134. | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 135. | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 136. | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 2. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 3. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 4. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 5. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 6. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 7. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 8. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 10. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 11. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 12. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 13. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 14. | 35 | अ | निलेश ज्ञानेश्वर कुंभारे | सदस्य |
| 15. | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त

श्री.हरिश दुबे, निगम सचिव

महापौर :— सन्माननिय सदस्यगण सभेची कार्यवाही सुरु करण्यात येते

निगम सचिव :— मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाने नागपूर महानगरपालिकेचे या पुर्वीचे मा.आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्त म्हणुन बदली झाली असुन त्यांच्या जागी श्री.अश्विन मुदगल यांनी दि. 26 एप्रिल 2017 रोजी म.न.पा. आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारलेला आहे. मा.आयुक्त श्री.अश्विन मुदगल या पुर्वी सातारा येथे जिल्हाधिकारी म्हणुन कार्यरत होते त्यांनी आपला अल्प परिचय या सभागृहाला करावा, अशी मी त्यांना विनंती करतो.

निगम आयुक्त :— मा.महापौरजी, व्यासपीठावर उपस्थित असलेले मा.उपमहापौरजी, या ठिकाणी उपस्थित सर्व सन्माननिय सदस्यगण, माझे नाव अश्विन मुदगल आहे. मी भारतीय प्रशासन सेवेच्या 2007 च्या बॅचचा अधिकारी आहे. माझे मुळ गाव मध्यप्रदेश मध्ये ग्वालियर आहे आणि तेथुन मी वाणिज्य विषयामध्ये पदवीधर आहे आणि त्याच्यानंतर इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यालयातुन पब्लीक पॉलिसीमध्ये मी कोर्स केला आहे. भारतीय प्रशासन सेवेमध्ये 2007 च्या बॅचमध्ये मला महाराष्ट्र कॅडर मिळालेला होता त्या अनुषंगाने माझे जे प्रशिक्षण आहे. ते नाशिक जिल्हामध्ये झाले. नाशिक जिल्हामध्ये प्रशिक्षण झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन मी सांगली जिल्हा परिषदमध्ये 3 वर्ष काम केलेले आहे त्याच्यानंतर यवतमाळ मध्ये जिल्हाधिकारी म्हणुन अडीच वर्ष काम केलेले आहे त्याच्यानंतर सातारा मध्ये जिल्हाधिकारी म्हणुन पावने तीन वर्ष काम केलेले आहे आणि आता नागपूर महानगरपालिकेमध्ये आयुक्तपदी गेल्या बुधवारी जॉइन झालेलो आहे, हा माझा अल्प परिचय आहे. जे काही महानगरपालिकेचे विषय आहे ते मी समजुन घेत आहे आणि चांगल्या पध्दतीने आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातुन लोकांना कशा चांगल्या पध्दतीच्या सेवा देता येतील त्या दृष्टीकोनातुन माझा प्रयत्न राहणार आहे.

**ठराव क्रमांक 18** :— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 25 (1) नुसार परिवहन समिती गठित करण्याचा प्रश्न विचारात घेतला

निगम सचिवः— मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 25 (1) नुसार परिवहन समिती गठीत करावयाची आहे. परिवहन समिती गठीत करतांना पक्षांचे तौलानिक संख्याबळ लक्षात घेवुन संबंधित पक्ष किंवा गटनेता कडुन नामनिर्देशन करुन घ्यावयाचे आहे. या समितीमध्ये एकुन 12 सदस्यांचा समावेश असुन सभापती स्थायी समिती हे 13 वे पदेन सदस्य म्हणुन या समितीमध्ये सदस्य असतील. भारतीय जनता पार्टी या पक्षांची सदस्य संख्या 108 असुन यांना एकुण 9 सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस या पक्षाचे एकुण 29 सदस्य असुन या पक्षाला एकुण 2 सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे. बहुजन समाज पार्टी या पक्षाची सदस्य संख्या 10 असुन या पक्षाला 1 सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे. मी मा.गटनेत्यांना विनंती करतो की त्यांनी परिवहन समिती करिता नामनिर्देशन मा.महापौरजी यांना सुपुर्द करावे.

महापौरः— गटनेत्यांनी परिवहन समिती सदस्यांची नावे मला सादर करावी.

(मा.विरोधी पक्षनेते यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांच्याकडे सादर केला.)

(मा.सत्तापक्षनेता यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांच्याकडे सादर केला.)

(मा.गटनेता बहुजन समाज पार्टी यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांच्याकडे सादर केला.)

मा.महापौरजी यांनी गट नेत्यांकडुन सादर करण्यात आलेले बंद लखोटे उघडुन मा.सदस्यांची नावे वाचण्याकरिता निगम सचिव यांना दिले.

निगम सचिव :— मा.महापौरजी, परिवहन समितीकरिता भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसचे गट नेता यांनी जी नावे सादर केली आहे ती मी वाचुन दाखवितो.

1. श्री.नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी
2. श्री.नितीन रामभाऊ साठवणे

भारतीय जनता पार्टी तर्फे परिवहन समिती करिता खालील प्रमाणे सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आलेले आहे.

1. श्री. बंटी कुकडे
2. श्री.प्रविण भिसीकर
3. श्रीमती अभिरुची राजगिरे
4. श्रीमती अर्चना पाठक
5. श्रीमती उज्वला शर्मा
6. श्रीमती मनिषा धावडे
7. श्रीमती विद्या मडावी
8. श्रीमती वैशाली रोहणकर
9. श्रीमती कल्पना कुंभलकर

निगम सचिव :— बहुजन समाज पक्षातर्फे परिवहन समिती करिता **श्री.नरेंद्र वालदे** यांचे नामनिर्देशन करण्यात आलेले आहे.

महापौरः— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 25 (1) नुसार परिवहन समिती करिता खालीलप्रमाणे सदस्यांची नियुक्ती करण्यात येते या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1. श्री.नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी
2. श्री.नितीन रामभाऊ साठवणे
3. श्री. बंटी कुकडे
4. श्री.प्रविण भिसीकर
5. श्रीमती अभिरुची राजगिरे
6. श्रीमती अर्चना पाठक
7. श्रीमती.उज्वला शर्मा
8. श्रीमती मनिषा धावडे
9. श्रीमती विद्या मडावी
10. श्रीमती वैशाली रोहणकर
11. श्रीमती कल्पना कुंभलकर
12. श्री.नरेंद्र वालदे

ठराव क्रमांक 19ः— नागपूर महानगरपालिके तर्फे महाराष्ट्र स्टेट टेक्सटाइल कॉर्पोरेशन सोबत झालेल्या करारनाम्याप्रमाणे 3 महिन्याचे आत नागपूर महानगरपालिकेला आखणी करुन हस्तांतरीत करण्याची संमती झाली होती. या अटीवर एम्प्रेस मिलच्या जागेची विभागणी करुन विक्रीची अनुमती देण्यात आली होती. याच करारनाम्याप्रमाणे मौजा नगापूर न.भु.क्र. 178/2, 178/3, 178/5, 178/6, 178/7 शीट क्र. 196 मधील 66201.00 चौ.मी. क्षेत्रफळाचा रस्ता कॉंक्रीटनी तयार करुन म.न.पा. ला हस्तांतरण करण्याची संमती महाराष्ट्र स्टेट टेक्सटाइल कॉर्पोरेशन ने दिली होती. या प्रस्तावानुसार जागेचा ताबा देऊन काम सुरु करण्यासाठी उचित निर्णय देण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री प्रविण दटके :— मा.महापौरजी, हया विषयाच्या संदर्भात मी आपणांस सांगु इच्छितो कि, जुनी एम्प्रेस मिल होती त्यावर सिमेंट रोड तयार झाला आहे, तो रस्ता आपल्या मालकीचा आहे. गेल्या अनेक दिवसापासून एम्प्रेस मिलवाले आपल्याला पजेशन देत नाही आणि आपण ते घेत नाही. तो निर्णय एक्सपार्टी करावा, यामुळे एक चांगला सिमेंट रोड आपल्याला मिळेल, त्याच्यावरून लोकांना सुचारूपणे जाता येईल. संबंधित अधिकाऱ्यांनी त्याच्या संदर्भात येथे सांगावे.

उपसंचालक (नगररचना) श्रीमती थुल :— मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात एक अभिन्यास नकाश्याला तत्वतः मंजूरी देण्यांत आली होती 11.1.2005 ला तेव्हा 20.12.2004 ला करारनामा करण्यांत आला होता. आणि त्या करारनाम्यामध्ये अट नमुद करण्यांत आलेली होती, परंतु तद्‌नंतर या प्लॅनकरिता अभिन्यास मंजूरी अंतिमतः घेण्यांत आलेली नाही. त्यामुळे हा रस्ता ही तदनंतर विकसीत झालेला नाही. परंतु 2015 मध्ये या रस्त्याखालील जागा महानगरपालिकेस बिना मोबदला हस्तांतरीत करावी म्हणुन

आमच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक 572, दिनांक 6.2.15 ला जनरल महाराष्ट्र टॅक्सटाईल कार्पोरेशन, यांना कळविण्यांत आले होते. त्या अनुषंगाने त्यांनी 20 फेब्रुवारी 2015 च्या पत्रान्वये शासनाचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या उच्चाधिकार समितीसमोर हा प्रश्न विचाराधिन असल्याने जोपर्यंत शासनाच्या पातळीवर यासंबंधात अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत विकासाकरिता आराखडा तयार करून महानगरपालिकेस सादर करण्यास वस्त्रोद्योग महामंडळास शक्य नाही, असे त्यांनी महानगरपालिकेस कळविलेले आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, महाराष्ट्र टॅक्सटाईल कार्पोरेशन ने एम्प्रेस मिल की जगह बेचने का निर्णय लिया, और वह निर्णय लेते समय उनके लिये एक शर्त बंधनकारक थी, जिस समय एम्प्रेस मिल ने वहां कंस्ट्रक्शन का काम शुरू किया उस समय एक प्लॉट के उपर उन्होने अपनी कॉलोनी डेव्हलप की, लेकिन जिस समय एम्प्रेस मिल को वह जगह बेचनी पडी तो बेचने के लिये उस प्लॉट का डिव्हीजन नितांत आवश्यक था। डिव्हीजन की अनुमती देना यह नागपूर महानगरपालिका के अधिकार क्षेत्र मे आता था, तात्कालीन कार्यकाल मे मैं उस प्रभाग का नगरसेवक था और नगरसेवक होने के नाते रेल्वे स्टेशन के पूर्व का व्दार प्रारंभ होंगा और रेल्वे स्टेशन के पूर्व का व्दार प्रारंभ होने के बाद उस रोड पर ट्रॉफिक ज्यादा बढेगी इसलिये उस रोड को सीधा हम लोग रजवाडा पॅलेस तक निकाल लेते है तो पूर्व व्दार पर होनेवाले ट्रॉफिक कंझेशन को समाप्त किया जाता सकता है इस भावना से उस नये रोड के निर्माण करने का महानगरपालिका के माध्यम से एक विषय हमने रखा। और महानगरपालिका ने तात्कालीन एम्प्रेस मिल टॅक्सटाईल कार्पोरेशन के जो पदाधिकारी थे, महानगरपालिका ने उनको एक पत्र दिया कि नागपूर शहर के विकास की दृष्टीसे यह जो जगह है यह रोड के लिये नागपूर महानगरपालिका के लिये नितांत आवश्यक है, यह रोड अगर बन जायेगा तो पूर्व व्दार से होनेवाले ट्रॉफिक कंझेशन को समाप्त किया जा सकता है और एक नया रास्ता निकलेगा जिसके कारण विकास के नये मार्ग भी खुलेगे। और अगर आप इस रोड को बनाने की अनुमती देते है और यह जगह निःशुल्क आप महानगरपालिका को हस्तांतरीत करते है और केवल निशुल्क हस्तांतरण करते है इतना ही नही इस रोड के निर्माण के लागत का खर्च भी आप स्वयं वहन करते है तो नागपूर महानगरपालिका आपको डिव्हीजन की अनुमती देंगी अन्यथा नही। मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका ने जब यह शर्त रखी कि उस रोड के निर्माण का खर्च भी आप करेगें, यह जगह भी आप महानगरपालिका को निःशुल्क देंगे और सिमेंट रोड भी महानगरपालिका को हस्तांतरीत करेगें तो हम एम्प्रेस मिल के प्रापर्टी के डिव्हीजन की अनुमती देंगे अन्यथा नही। तात्कालीन टॅक्सटाईल कार्पोरेशन के अधिकारीयो ने इस बात को मंजूर किया, मा.महापौरजी, एक एग्रीमेंट साईन हुआ उस अग्रीमेंट पर लिखा गया कि तीन महिने के अंदर पुरी कारवाई करके नागपूर महानगरपालिका को यह जगह हस्तांतरीत करदी जायेगी। मा.महापौरजी, महिने का साईज कितना बडा होता है यह मुझे मालुम नही, लेकिन यह जो एग्रीमेंट हुआ यह 2004 मे हुआ और 2004 मे एग्रीमेंट होने के बाद तीन महिने अभी तक नही हुऐ यह चिंता का विषय है। मा.महापौरजी, सौभाग्य से 2012–13 मे मैं स्थायी समिती का अध्यक्ष बना, और स्थायी समिती का अध्यक्ष बनने के बाद स्थायी समिती के माध्यम से एक पत्र हमने राज्य शासन को भेजा, तात्कालीन आयुक्त मा.वर्धनेजी थे उन्होने राज्य सरकार को इस बात का

पाठपुरावा करने के लिये एक पत्र भेजा, उस समय मुखर्जी नाम के वहां पर एक अधिकारी थे जो शायद कभी तो वर्धनेजी के सिनिअर रहे होंगे। जिसमे उन्होने पत्र तो अधिकृत आफिशियल लिखा लेकिन उपर प्रिय श्याम यह शब्द भी लिख दिया जिससे उनके व्यक्तिगत संबंध का पता चलता है। मा.महापौरजी, वह पत्र आने के बाद उन्होने कहां कि बहुत जल्दही इस विषय पर निर्णय लेगे। यह 2012–13 की बात है 2014 मे मजबुरी मे मुझे इस प्रश्न को फिर से सभागृह मे उपस्थित करना पडा, 2014 मे सभागृह मे प्रश्न उपस्थित करने के बाद अभी 2017 है। मा.महापौरजी, जो जमिन हमे निःशुल्क मिलनेवाली है, जिस जमिन पर बांधकाम का खर्च भी टॅक्सटाईल कार्पोरेशन करनेवाला है, और जिस जगह महानगरपालिका का एक पैसा न लगते हुऐ एक नये डी.पी.रोड का जन्म होनेवाला है, ऐसी जगह को हस्तांतरीत करने मे अगर शासन आज तक विफल रहा है तो तो संजीदगी से विचार करना चाहिये कि इसके लिये दोषी कौन है। मा.महापौरजी, मैं इस विषय पर किसी पर कारवाई करने का निवेदन नही करना चाहता, कारण मान्यवर महोदयाने मुझे बताया कि उस समय सभागृह से प्रस्ताव पारीत हुआ वह 37 की कारवाई के लिये पारीत हुआ लेकिन जो प्रेस नोटीफिकेशन निकालकर आब्जेशन कॉल करना था वह हम उस समय नही कर सके इसलिये उपसंचालक, नगररचना ने वह काम अभी अभी शुरू किया है। अभी कारवाई शुरू हुई है, मेरा इसमे एक निवेदन है कि 37 की कारवाई बाद मे होते रहेगी, लेकिन एग्रीमेंट के मुताबिक तीन महिने के अंदर उस जगह को हस्तांतरीत करने का काम टॅक्सटाईल कार्पोरेशन ने करना चाहिये था, वह तीन माह की जगह 2004 से 2017 तक तेरा साल लग गये तो नागपूर महानगरपालिका ने अपने अधिकार क्षेत्र मे उस जमिन का एक्स–पार्टी अधिग्रहण करने का निर्णय आजके सभागृह मे पारीत करके वह जमिन अधिग्रहित करनी चाहिये। इस प्रकार का निर्देश आप इस सभागृह के माध्यम से दे ऐसा मैं आपसे निवेदन करता हुॅं।

वरील चर्चेनंतर मा सदस्यांच्या चर्चेचा मानस लक्षात घेता नागपूर महानगरपालिके तर्फे महाराष्ट्र स्टेट टेक्सटाइल कॉर्पोरेशन सोबत झालेल्या करारनाम्याप्रमाणे 3 महिन्याचे आत नागपूर महानगरपालिकेला आखणी करुन हस्तांतरीत करण्याची संमती झाली होती. या अटीवर एम्प्रेस मिलच्या जागेची विभागणी करुन विक्रीची अनुमती देण्यात आली होती. याच करारनाम्याप्रमाणे मौजा नगापूर न.भु.क्र. 178/2, 178/3, 178/5, 178/6, 178/7 शीट क्र. 196 मधील 66201.00 चौ.मी. क्षेत्रफळाचा रस्ता काँक्रीटनी तयार करुन म.न.पा. ला हस्तांतरण करण्याचची संमती महाराष्ट्र स्टेट टेक्सटाइल कॉर्पोरेशन ने दिली होती. या प्रस्तावानुसार जागेचा ताबा देऊन काम सुरु करण्यासाठी उचित निर्णय देण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवुन महाराष्ट्र स्टेट टेक्सटाईल कॉपोरेशन व म.न.पा. यांच्यामध्ये झालेल्या कराराप्रमाणे 3 महिन्याच्या आत जागेचा ताबा देणे बंधनकारक असून देखील सन 2004 पासून बराच अवधी गेल्यामुळे आणि शासनास वारंवार ही बाब निदर्शनास आणून देखील शासनाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे या भागातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्याची नितांत गरज असल्यामुळे महानगरपालिकेने एकतर्फा (एक्सपार्टी) ताबा घेवून रस्ता निर्माण करण्याची कारवाई करावी या मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी यांनी केलेल्या सुचनेसह व मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेसह सादर केलेल्या नोटीसची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, प्रश्नोत्तराला सुरूवात केली पाहिजे. परंतु मला असे आठवते कि, मागच्या सभागृहामध्ये एक आचार संहिता सर्वपक्षीय समितीने तयार केली होती त्या आचार संहितेमध्ये काय नियम होते काय पध्दतीने आपण सभागृह चालविण्याच्या दृष्टीने प्रश्नोत्तर विचारले पाहिजे, त्याच्या संदर्भात नियम बनविले होते मी आपल्यामार्फत सचिवांना विनंती करतो कि त्यांनी त्याचे वाचन करावे.

निगम सचिव :– मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या 19–01–2016 च्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रश्नोत्तराच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे निर्देश देण्यांत आले होते. मा.सतापक्ष नेता यांनी प्रश्नोत्तराच्या संदर्भात ज्या सूचना मांडल्या. त्यानुसार मा.सदस्यांकडुन आलेल्या प्रश्नाच्या संदर्भात निगम सचिव हे आलेल्या प्रश्नांवरून 10 प्रश्नाचा ड्रॉ काढुन सभागृहात ठेवतील व उरलेल्या प्रश्नाचे लेखी उत्तर दिले जातील. एका मा.सदस्यांचे एकच प्रश्न सभेमध्ये घेता येईल अशी सूचना होती या सूचनेनुसार आपण मागच्या कार्यकाळामध्ये 10 प्रश्नाची निवड केली आणि प्रत्येक प्रश्नाला आपण 6 मिनिटाचा वेळ चर्चेकरिता देवून एका तासामध्ये आपण 10 प्रश्न मार्गी लावले.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, आता ज्याप्रकारे सांगीतले कि 10 प्रश्न विषय पत्रिकेवर घ्यावयाचे आहे आणि ते निगम सचिव ठरविणार आहे. म्हणजे निगम सचिवांना आपण अधिकार दिलेत काय ? म्हणजे नगरसेवक जर एखादा चांगला प्रश्न सभागृहामध्ये देत असेल तर तो निगम सचिवाला इतका मोठा अधिकार आहे कि ते एक चांगला प्रश्न ही एखादया वेळेस ठेवु शकत नाही. माझे म्हणणे असे आहे कि,...

श्री दयाशंकर तिवारी :– पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका के इस सभागृह मे 40–40, 50–50 प्रश्न विषय पत्रिका पर रहते है। मैं अगर उदाहरण देना चाहुं तो पानी की समस्या का जो पत्र आता था वह मई महिने मे आता था, और उस पर चर्चा जिस समय होती थी उस समय अगला जनवरी आ चुका होता था, इतने सारे प्रश्न प्रलंबित रहते थे इसलिये सभागृह का संचालन सूत्रता नियमांतर्गत अनुशासन से होनी चाहिये, समयबध्द प्रश्न का समयबध्द उत्तर मिलना चाहिये, इस दृष्टीसे इस सभागृह मे एक निर्णय लिया गया। मा.महापौरजी, उसमे निर्णय यह लिया गया कि, प्रत्येक सभागृह मे केवल 10 प्रश्न पुछे जायेगे। अब यह 10 प्रश्न कैसे पुछे जायेगें तो इसके लिये सभागृह के माध्यम से एक निर्णय सर्वसम्मती से हुआ हमारे पास जो प्रश्न मा.सदस्यों के माध्यम से आते है, वह सारे के सारे प्रश्न हम लोग एक जगह डाले और चिठठी निकालकर के उसमे से 10 प्रश्नो का चयन करे और वह चयनीत 10 प्रश्नो का उत्तर दे उसमे कोशिश यह करे कि, एक नगरसेवक के एकसे ज्यादा प्रश्न उसमे नही आना चाहिये। इसप्रकार की व्यवस्था की गयी अगर केवल 10 ही प्रश्न आते है तो चिठठी निकलने की कोई आवश्यकता नही है, अगर 10 से ज्यादा प्रश्न आते है तो चिठठी निकालना चाहिये, सभागृह मे आनेवाले प्रश्न जो है, उसकी तारतम्यता नही होती

थी और एकही प्रकार के प्रश्न 15–15 मा.सदस्य पुछ लेते थे, इसलिये उसमे और एक चिज जोडी गयी सत्तापाक्ष के जो नेता है, अगर सत्तापक्ष के लोग किसी प्रकार का प्रश्न पुछना चाहते है तो सत्तापक्ष के नेता ने उस प्रश्न पर अपना पत्र लगाकर निगम सचिव के पास भेजना चाहिये। और विरोधी पक्ष का कोई व्यक्ति अगर प्रश्न पुछना चाहता है, या गटनेता कोई प्रश्न पुछना चाहता है तो उसका गटनेता जो है उसका पत्र लगाकर, विरोधी पक्षनेता का पत्र लगाकर वह प्रश्न आना चाहिये। यह परंपरा सहजता से इस सभागृह मे शुरू थी उसमे किसी भी प्रकार के अच्छे प्रश्न को रोका गया ऐसा नही है। संदिपजी सहारे के भी प्रश्न इन्होने सभागृह मे जो भी रखे चर्चा के लिये यहां आये है। एक सूसूत्रता सभागृह के संचालन की होनी चाहिये इसलिये उस समय ऐसा निर्णय लिया गया, केवल व्यवस्था की दृष्टीसे यह आचार संहिता बनाई गयी है।

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, आता सांगण्यात आले ड्रॉ सिस्टीम द्वारे परंतु यांनी आधी असे सांगीतले कि निगम सचिव 10 प्रश्न ठरवतील, म्हणुन मला उभे व्हावे लागले.

श्री प्रविण दटके :– मा.महापौरजी, ड्रॉ काढतांना त्याची व्हिडिओ शुटिंग होईल, कोणाच्या हस्ते काढली गेली, कोणाची चिठठी आली, हे सर्व त्यात नमुद राहील.

निगम सचिव :– मा.महापौरजी, मागच्या वेळेस 28–9–2016 रोजी जो ड्रॉ आपण काढला होता, त्या ड्रॉ मध्ये मा.तत्कालीन सत्तापक्ष नेते, मा.तत्कालीन विरोधी पक्षनेते, मा.तत्कालीन गटनेता बहुजन समाज पार्टी यांच्या समक्ष आपण तो ड्रॉ काढलेला होता आणि त्याची व्हिडिओग्राफी सुध्दा केली होती आणि यानंतर जेव्हा केव्हा ड्रॉ काढण्यात येईल, मा.सत्तापक्ष नेता, मा.विरोधी पक्षनेता व मा.गटनेता यांच्या उपस्थितीतच ड्रॉ काढण्यात येईल.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, चांगली गोष्ट आहे त्याची व्हिडिओ शुटींग होईल, परंतु एक सूचना मी देवु इच्छितो, नागपूर महानगरपालिकेच्या या सभागृहामध्ये आपण जे रूलिंग देतात, मिनिटस् बनवितांना, अजेंडा बनवितांना त्या मिनिटसमध्ये गडबड झालेली आहे. आणि जर पारदर्शिकतेची गोष्ट आपण करीत असेल तर या सभागृहाच्या संपुर्ण कामकाजाची व्हिडिओ शुटींग व्हावी, अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, याला कोणाची हरकत असण्याची गरज नाही. सभागृहाच्या संपुर्ण कामकाजाचे ऑडिओ रेकॉर्डिंग करण्यास अनुमती आहे.

महापौर :– मान्य आहे.

<u>प्रश्न क्र. 1</u>:– पुर्व नागपूर मध्ये 24X7 पाणी योजना व भांडेवाडी डंम्पींग यार्ड संदर्भात माहिती.

श्री दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, मी 24X7 च्या संदर्भात प्रश्न केला होता, या योजनेंतर्गत कुठल्या

कुठल्या एरीयामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यांत येत आहे, याचे विभागाने उत्तर दिले नंदनवन, कळमना या एरीयाचे नांव दिले परंतु उर्वरीत एरीयामध्ये 24X7 चे पाणी का देत नाही, याचे कारण सांगण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी प्रश्न केला होता कि कोणत्या एरीयामध्ये 24X7 योजनेंतर्गत पाणी पुरवठा केला जातो, ज्या ज्या एरीयामध्ये या योजनेंतर्गत पाणी पुरवठा सुरू झालेला आहे, त्याचे नांव आम्ही आपणांस दिलेले आहे, पूर्व नागपूरमधल्या जास्तीत जास्त एरीयाचे नांव आपणांस दिले आहे.

श्री दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, मी कुठल्या एरीयामध्ये या योजनेंतर्गत पिण्याचे पाणी देणे सुरू झाले नाही याचे कारण विचारले होते.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, कॅपेक्सचे जे काम आहे ते पुर्ण झालेले नाही कारण कि आपल्याला निधी अप्राप्त होता आता निधी प्राप्त झालेला आहे. 31 मार्चच्या शासनाच्या जी. आर.प्रमाणे आपल्याला 15 एप्रिलला निधी प्राप्त झालेला आहे. आम्ही त्याचा प्लॅनिंग केलेला आहे दिड वर्षामध्ये पुर्ण काम होतील.

श्री दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, पूर्व नागपूरमध्ये किती वर्षात 24X7 ही योजना पुर्ण करणार होते.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, या योजनेच्या संदर्भात 1 मार्च 2012 ला आपण करारनामा केला होता, त्याप्रमाणे पांच वर्षात हे काम पुर्ण करावयाचे होते, यासाठी आपल्याला निधी पाहिजे होती, आपल्या 162 कोटी रूपये शासनाकडुन मिळवु शकले नाही. आता निधी प्राप्त झाला आहे, ते काम आपण लवकर पुर्ण करणार आहे.

श्री दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, साहेबांचे म्हणणे आहे कि निधी उपलब्ध झाला नव्हता, हे बरोबर आहे काय ?

महापौर :– मा.सदस्यगण, त्यावेळेस निधी प्राप्त झाला नव्हता परंतु आता निधी प्राप्त झाला आहे, कामे लवकर पुर्ण होतील.

श्री दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, आता पांच वर्ष पुर्ण झाले आम्ही 2012 ची गोष्ट करीत आहे. पांच वर्षाची लिमिट दिली होती, पांच वर्षापासुन लोकांना तेथे पाणी मिळत नाही.

महापौर :– या प्रश्नाचे उत्तर आयुक्त देतील.

निगम आयुक्त :– मा.महापौरजी, 24X7 योजनेच्या अनुषंगाने 1 मार्च 2012 ला करारनामा झाला

होता तो पांच वर्षाचा होता, तो करारनामा 31 मार्च 2017 पर्यंत होता. मध्यंतरीच्या कालावधीमध्ये कॅपेक्सचे जे काम होते ते काम करण्यासाठी पैसे उपलब्ध नव्हते. त्यामुळे कामाची जी प्रगती आहे ती समाधानकारक झाली नाही. परंतु आता शासनाच्या माध्यमातुन 95 कोटी रूपये उपलब्ध झालेले आहे. त्या 95 कोटी रूपयांच्या माध्यमातुन कॅपिटल एक्सपिंडीचरची कामे आपल्याला करावयाची आहे त्याचे नियोजन करण्यांत आलेले आहे. प्राथमिकता फिक्स केलेली आहे, याबाबत वॉटर डेलिगेटसची मिटींग घेवून त्यांना सूचना करण्यांत आलेली आहे. मा.सदस्यांनी ही या अनुषंगाने काही सूचना केल्या आहेत त्या अनुषंगाने प्राथमिकता तय करून ओसीडब्लु ला कामे करण्याची सूचना दिलेली आहे. 95 कोटी रूपयांच्या माध्यमातुन पुढील कालावधीमध्ये कॅपेक्सचे काम केल्या जातील मग जो अनेक ठिकाणी पाण्याचा प्राब्लेम आहे तो आपण मार्गी लावु.

श्री दुनेश्वर पेठे :— मा.महापौरजी, मला ही माहिती पाहिजे की, त्या निधीमुळे कोणते काम अडकले आहे म्हणजे 24X7 योजनेमध्ये पाण्याच्या पाईपलाईन, पेंच 3, पेंच 4 पाण्याच्या टाकीमुळे अडकले आहे किंवा पाईपलाईन टाकण्यासाठी पैसे आले आहे म्हणजे कुठल्या कारणामुळे काम थांबलेले आहे.

महापौर :— विभाग प्रमुखांनी उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, या प्रकल्पामध्ये जे काम होते ते जवळपास 676 कि.मी. ची पाईप लाईन टाकावयाचे काम होते. घरोघरी हाउस सर्व्हीस कनेक्शन लावायचे काम होते, फ्लो मीटर लावायचे काम होते, काही प्लॉन्टचे रिहॅबिटेशन करायचे होते, टाक्यांचे रिहॅबीटेशन करायचे होते, ही सर्व कामे होती. त्यापैकी पाईप लाईनचे काम 580 कि.मी पैकी 576 कि.मी. ची पाईप लाईनचे काम पुर्ण झाले आहे. हाउस सर्व्हीस कनेक्शन 3,20,000 पैकी 1,40,000 झालेले आहे. हाउस सर्व्हीस कनेक्शनसाठी पाईप लाईनचे काम बॅलेन्स आहे.

श्री दुनेश्वर पेठे :— मा.महापौरजी, गायकवाड साहेबांना सर्व माहिती आहे ते माहिती लपविण्याचे काम करीत आहे. त्यांनी योग्य माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, मी माहिती लपविण्याचे काम करीत नाही जो प्रोग्रेस रिपोर्ट आहे तो सांगत आहे.

श्री दुनेश्वर पेठे :— मा.महापौरजी, तेथे बाभुळबन पाण्याच्या टाकीचा एक विषय आहे. येथे मा. अधिकारी उपस्थित आहे इसराईल साहेब आहे त्यांनी टाकीसाठी निधी उपलब्ध करुन ठेवला आहे. परंतु 4 वर्षापासुन निधी उपलब्ध करुन ठेवल्यानंतर ही ते काम प्रशासनानी केलेले नाही आणि हे म्हणतात की निधी नाही. म्हणजे हे सर्व खोटे बोलणे आहे या सभागृहात जर हे अधिकारी खोटे बोलत आहे तर आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, आपण मला प्रश्न केला होता की 24X7 मधली कामे आणि आता जे बाभुळबन टाकीचे काम आहे ते पेंच प्रोजेक्ट मधले काम आहे.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मुद्या असा आहे की कॅपेक्स विभागातर्फे पुर्ण नागपूर शहर खोदुन ठेवले आहे. आणि ते खोदुन इतके खड्डे पडले आहे कि, लोक त्याच्यात पडत आहे. ॲक्सीडेंट होत आहे. आणि कॅपेक्सच्या कामाकरिता पैसे नाही म्हणुन नगरसेवकांची इतकी मानहानी होते की लोक नगरसेवकांच्या घरावर येवून त्यांना शिवीगाळ करतात आणि कॅपेक्सच्या नावाखाली खड्डे खोदुन दोन—दोन, तीन—तीन वर्षापासुन ठेवले आहे. पैसे नाही हे काही कारण नाही कॅपेक्सच्या कामाकडे विभागाचे बिलकुल दुर्लक्ष आहे त्याच्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे कारण 24X7 च्या नावाखाली पुर्ण शहर खोदुन खड्डे पाडण्याचे काम विभागाने केले आहे आणि ते किती दिवसात आणि केव्हा पुर्ण करतात त्याची आपण माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, मी आधीच सांगितले की दीड वर्षामध्ये प्रकल्पाचे काम पुर्ण होईल.

श्री दुनेश्वर पेठे :— मा.महापौरजी, गायकवाड साहेबांना माहिती आहे जवळपास कामे झाली आहे. 24X7 अंतर्गत काही विशेष भागामध्ये पाणी न देण्याचे कारण म्हणजे बाभुळबन पाण्याची टाकी आहे आणि हया पाण्याच्या टाकीच्या निर्माण कार्याला काही विशिष्ट लोकांचा विरोध आहे त्या विरोधामुळे पाण्याची टाकी बनवित नाही.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या बाभुळबन टाकीच्या संदर्भात अनेक मतेमतांतर या ठिकाणी झाले आहे. मागच्या वेळला मा.तत्कालीन महापौरजी, मा.तत्कालीन आयुक्त, आणि मी स्वतः ज्यावेळी वॉटर वर्क्स कमेटीचा चेअरमन होतो आम्ही सर्वांनी त्या ठिकाणी व्हीजीट केली होती आणि नागरीकांशी चर्चा करुन त्यांना तेथील ग्राउंड डेव्हलप करुन महानगरपालिका देणार याच्या संदर्भात मला असे वाटते की आयुक्तांनी पत्र देखील दिलेले होते आणि हे होत असतांना त्या ठिकाणी या कामाला विरोधही आहेच, दुर्देवाने त्या भागातील 100—200—500 लोकांमुळे उर्वरीत भागातील 5 हजार नागरिकांवरती पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या निर्माण होते. माझी आपणाला नम्र विनंती आहे की याबाबतीत अत्यंत कठोर निर्णय घेणे गरजेचे आहे प्रसंगी वेळ पडल्यास पोलीस प्रोटेक्शन ठेवून त्या ठिकाणी जी काही कारवाई करायची ती कारवाई करुन बाभुळबनची पाण्याची टाकी बांधणे गरजेचे आहे. मा.आयुक्तांनी यामध्ये लक्ष घालावे, पोलीस विभागाला सोबत घ्यावे आणि ही पाण्याची टाकी सुरू करावी. त्या ठिकाणी नागरिकांशी बोलणे झालेले आहे. मी दुनेश्वर पेठे यांना देखील विनंती करतो की त्यांनी देखील पुढाकार घ्यावा आणि याच्यामध्ये सोलुशन जे आहे ते एकच आहे प्रसंगी कठोर निर्णय घेवुन हया टाकीच्या बांधकामाला सुरुवात करणे गरजेचे आहे.

महापौर :— आयुक्तांनी या विषयामध्ये लक्ष घालुन हा विषय मार्गी लावावा.

प्रश्न क्र. 2:— स्वामीनारायण मंदीर वाठोडा रिंग रोड येथील पुल व रोडचे रुंदीकरण व पिण्याच्या पाईप लाईन तोडल्या संदर्भात माहिती

श्री.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, दि. 02 मार्चला माझ्या प्रभागात स्वामी नारायण मंदिराजवळ 150, 200 व 300 मि.मि. व्यासाच्या पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन आर.पी.एस.कंपनीनी तोडल्या, जवळपास 16 लक्ष रूपयांचे महानगरपालिकेचे नुकसान केले. त्या भागात जवळपास सात दिवस 600

फे–याव्दारे पाणी पुरवठा करण्यांत आला. आर.पी.एस.कंपनीला जलप्रदाय विभागानी 18.10.2016 ला त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन आहे म्हणुन पत्र दिले. परंतु या आर.पी.एस. कंपनीनी या सगळया गोष्टीकडे दुर्लक्ष करून या तीनही पाईप लाईन तोडल्या. दुर्देव असे आहे कि जलप्रदाय विभागाने जे उत्तर मला दिले त्यात त्यांनी सांगीतले कि फक्त 29 हजार रूपये त्या कंपनीकडुन वसुल करण्याचे प्रस्तावित आहे. आणि एक लाईन तुटली ती दुरूस्त केली परंतु 150 आणि 300 एम.एल. पाईप लाईनचे काम करावयाचे आहे. माझा प्रश्न काय होता आणि त्याचे उत्तर प्रशासनाने निश्चितपणे दिलेले नाही आणि सभागृहाची दिशाभुल करण्याचे काम प्रशासनाने केलेले आहे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, आर.पी.एस.कंपनीने ज्या पाईप लाईन तोडलेल्या आहे तो रस्ता शासनाच्या बांधकाम विभागाचा होता तेथे पुलाचे काम सुरू होते, त्यांनी लाईन तोडली होती हे खरे आहे त्या दरम्यान आपल्याला पाण्याच्या ट्रिप त्या भागात पाठवाव्या लागल्या, याच्यामध्ये जो नुकसान झाले आहे तो आपण त्यांच्याकडुन वसुल करू.

श्री.धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, आपण आर.पी.एस.कंपनीला पत्र लिहितांना हे कबुल केले कि म.न.पा.चे 16 लक्ष रूपयांचे नुकसान झालेले आहे. जर पत्र लिहितांना प्रशासन असे लिहिते मग माझ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगण्यात येते कि फक्त 29 हजार रूपये त्यांच्याकडुन घेणे प्रस्तावित आहे. मग ही तफावत कशी काय झाली ? आणि याच्यामध्ये काय काय झाले ? ही माहिती आम्हाला कळली पाहिजे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, तो पत्र डेलिगेटसनी त्यांना लिहिले होते, त्याठिकाणी पुलाचा काम होते, तेथे एक लाईन तुटली होती,

श्री धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, हे 29 हजार रूपये आणि 16 लक्ष रूपये याच्यात फरक किती आहे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, फरक खूप आहे परंतु डेलिगेटसनी त्यांच्या स्तरावर त्या कंपनीला पत्र दिले होते. मग त्याठिकाणी लाईन जोडण्यात आल्या आहेत.

श्री धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, डेलिगेटस अनुभवी नाहीत काय ? डेलिगेटसला टॅक्नीकल नॉलेज नाही काय ? मग आपण विभाग प्रमुख म्हणुन काय काम करता? मला जे उत्तर देण्यांत आले आहे त्यात 1 लाईन 200 मि.मि.व्यासाच्या पाईप लाईन जोडल्याचे सांगीतले आहे हे खरे आहे काय ? तुम्ही आज सांगता कि दोन लाईन जोडल्या आहेत हे खरे आहे कि ते खरे आहे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, त्याठिकाणी दुसरी लाईन जोडण्याचे राहिले आहे. मला असे डेलिगेटसनी सांगीतले आहे, मी जी माहिती दिली आहे ती खरी आहे.

श्री धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, मला उत्तरात दुरूस्ती करून तुम्ही देवु शकले असते. ही जी आर.पी.एस. कंपनी आहे या कंपनीने माझ्या प्रभागातल्या स्पॅन्कोच्या लाईनचे केबल तोडले आहे. त्याच्यामध्ये स्पॅन्कोनी एफ.आय.आर.केला आहे. प्रशासनाने ज्यापध्दतीने कार्यवाही करावयास पाहिजे ती केली नाही, महानगरपालिकेचे नुकसान होत आहे, आपल्या विभागामार्फत दंडाची कार्यवाही केली पाहिजे, असे मला वाटते

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, या संपूर्ण विषयात मागच्या सभागृहामध्ये श्री मेश्राम यांनी माहिती विचारली होती, त्यावेळी माहिती उत्तरामध्ये एक लाईन दुरूस्त केल्याची माहिती प्रशासनाव्दारे देण्यांत आली होती. शेवटी महानगरपालिकेत कुठल्याही पक्षाचे सदस्य असो त्यांच्या भागामध्ये खोदकाम सुरू असतांना यापध्दतीची रचना होत असेल एखादी लाईन तुटत असेल तर लोक त्यांच्या अंगावर जातात, आणि डेलिगेटस या पध्दतीने लिहित असेल कि 29 हजार रूपयांचा नुकसान झाले आहे, आणि दुसरीकडे 16 लक्ष रूपयांचे नुकसान सांगत असेल तर हे अत्यंत अयोग्य आहे. एखादे विकास काम करीत असतांना एखादी लाईन तुटली व ती दुरूस्त करून देणे हे बरोबर आहे, परंतु त्यावर काही न काही दंड देखील आकारण्यांत आला पाहिजे अन्यथा तो विकास काम करणारा इतका बिंदास्त असतो कि, मी काही ही काम करावे, कोणत्याही लाईन तोडाव्यात, आणि त्याचा मात्र त्रास सर्वसामान्य माणसाला आणि त्या भागातल्या मा.सदस्यांना होतो. माझी आपणांस विनंती आहे कि, यामध्ये प्रशासनाला आपण आदेश द्यावे कि आर.पी.एस.ही जी कंपनी आहे त्याच्याकडुन काम करून घेवुन त्यांच्यावरती काही न काही दंड देखील या संपुर्ण प्रकरणामध्ये आकारण्यात यावा. जेणेकरून संपुर्ण नागपूर शहरामध्ये जे काम सुरू आहे, त्याच्या संदर्भात एक मॅसेज जाईल कि कुठल्याही पध्दतीचे काम करीत असतांना युटीलिटीला हाथ लावु नये.

महापौर :– सत्तापक्षनेता यांनी दिलेल्या सूचनेवर मा.आयुक्तांनी लक्ष घालुन हा प्रश्न मार्गी लावावा.

<u>प्रश्न कमांक 3</u> :– नागपूर शहरात म.न.पा. द्वारे विविध ठिकाणी सिमेंट रोडचे बांधकाम संदर्भात माहिती

श्री संजय महाकाळकर :–मा.महापौरजी, वृत्तपत्रामध्ये नागपूर शहरामध्ये सुरू असलेल्या सिमेंट रोडच्या कामाबाबत, निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत बातमी प्रकाशित होत आहे. महापौरजी, संपुर्ण शहरामध्ये जे काही विकास काम होत आहे, जी काही सिमेंट रोडची कामे होत आहे. विकास कामाला आमचा विरोध नाही परंतु ज्यापध्दतीने ही कामे होत आहे, ते नागपूर शहराच्या जनतेला दाखविण्यासाठी होत आहे काय ? महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पूर्वी जी गती या सिमेंट रोडच्या कामाची होती ती गती का मंद झाली आहे त्याचे स्पष्टीकरण देण्यांत यावे. फेस–1 मध्ये 30 रस्ते, फेस–2 मध्ये 58 रस्त्यांचे काम सुरू होते. परंतु पहिल्या फेसमध्ये संपुर्ण रस्त्याचे काम या शहरामध्ये सुरू झालेले आहे काय ?  व काही रस्त्यांचे काम सुरू करण्याचे बाकी आहे काय ? ते जर बाकी असेल तर त्याचे काय कारण आहे हे आम्हाला सांगण्यात यावे.

कार्यकारी अभियंता (बांधकाम) :– मा.महापौरजी, नागपूर शहरात दोन टप्प्यात सिमेंट रोडचे काम सुरू आहे त्यापैकी प्रथम टप्प्यात 30 रस्ते 29.77 कि.मि.चे आपण घेतलेले आहे. त्यापैकी 12 रस्त्यांचे

काम पुर्ण झालेले आहे त्याची लांबी साधारणतः 10.27 कि.मि. आहे. आणि सध्यास्थितीत 10 रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पाच्या मुदतीचा कालावधी जानेवारी 2018 पर्यंत आहे. आपण त्या कालावधीमध्ये हया रस्त्यांचे काम पुर्ण करू. याच्यात काही रस्ते वगळण्याचे आपण प्रस्तावित केलेले आहे कारण कि काही रस्त्यावर जलवाहिनी रस्त्याच्या डिव्हायडरच्या बाजुने गेलेली आहे, त्याठिकाणी कॉंक्रिट करणे योग्य नाही. असे रस्ते वगळण्याचा आपला मानस आहे, जसा गोरेवाडाचा रस्ता आहे त्या रस्त्यावर संपुर्ण नागपूर शहराच्या पेंच–1 ची जलवाहिनी आहे, अश्याप्रकारचे रस्ते आपण या प्रकल्पामधुन कमी करणार आहे.

श्री तानाजी वनवे :— मा.महापौरजी, विभागानी जी माहिती दिलेली आहे, जे रस्ते पहिल्या फेस व दुस–या फेसमध्ये झालेले आहे या रस्त्यामध्ये भेगा पडलेल्या आहेत, त्याच्यामध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्याच्याबाबत आपण काय करणार आहे.

कार्यकारी अभियंता (बांधकाम) :— मा.महापौरजी, पेंच टप्पा–1 व पेंच टप्पा–2 या दोन्ही रस्त्यांच्या कामात ज्या भेगा पडलेल्या आहे त्या संदर्भात मी सांगु इच्छितो कि क्रॅक्स सर्फेसला येतात त्याचे विविध कारणे आहेत. काही सर्फेसला ला क्रॅक्स असतात, काही ड्रायनिंग क्रॅक्स असतात. या सर्वांचा आपण मॅपिंग करतो आहे आपण साधारणतः फेस टप्पा–2 मध्ये 13980 मॅपिंग करून क्रॅक्स आयडेंटीफाय केलेले आहे. आणि जे कॅक्स आपण आयडेंटीफाय केलेले आहे एक दोन वगळता असे कुठेही दिसलेले नाही. जे कॅक्स दिसत आहे ते साधारणतः नॉर्म्सप्रमाणे आपण तपासतो आहे साधारणतः 2–3 सेंटीमिटरपर्यंतच्या कॅक्स असतात, या कालावधीमध्ये कॉकिटचा जे आयुष्यमान असते ते आपण गृहित धरत नाही. 3 ते 12 एम.एम.चे कॅक्स आपण भरू शकतो. 12 एम.एम.च्या वरच्या कॅक्सचे पुर्ण आम्ही मॅपिंग करीत आहे. आणि त्याप्रकरणी ठेकेदाराला आपण कामाचे पेमेंट केलेले नाही. हया सर्व कामाचे ज्युटेक मॅपिंग करीत आहे. या प्रकरणी आपण व्ही.एन.आय.टी.कडुन डिझाईन घेतलेले आहे. आणि व्ही.एन.आय.टी.चे प्रोफेसर इंगळे सर हे आपल्याला अभिप्राय देतील कि पॅनल ठेवायचे आहे कि रिजेक्ट करायचे आहे त्याप्रमाणे आपण कार्यवाही करू.

श्री संजय महाकाळकर :— मा.महापौरजी, या शहरामध्ये सुरू असलेले जे सिमेंट रोडचे काम आहे. त्या प्रत्येक सिमेंट रोडमध्ये नागरिकांचा पैसा लागलेला आहे, आणि जी कामे या शहरामध्ये सिमेंट रोडची सुरू आहे ती अत्यंत निकृष्ट दर्जाची आहे, 12–12 एम.एम.पर्यंत त्या रोडला क्रॅक येत आहे म्हणजे कुठे तरी त्या रोडमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द होत आहे.

श्री संदिप जोशी :— मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, माझी आपल्यामार्फत विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे कि, सिमेंट रोडमध्ये भ्रष्टाचार झाला, सिमेंट रोडचे काम निकृष्ट झाले आहे, या पध्दतीचे चुकिचे आरोप कृपया सभागृहामध्ये करू नये, अभियंत्यांनी, विभाग प्रमुखांनी आता सांगीतले कि सिमेंट रोडमध्ये क्रॅक्स आले, ते क्रॅक्स येण्याच्या मागचे कारणे काय ? मला टॅक्नीकली माहिती नाही, मी वाणिज्यचा पदवीधर आहे, परंतु मी ज्यावेळी माहिती घेतली त्यावेळी लक्षात असे आले कि, या क्रॅक्स मागचे जे संपुर्ण गणीतीकरण आहे, हे कशाच्या भरवश्यावर ठरवितात, हे कोण ठरवितात, या शहरामध्ये

इंडियन रोड कॉंग्रेस ज्याला असे म्हणता येईल कि कुठल्याही धर्मामध्ये गीता, कुरान, बायबल राहतात, त्यापध्दतीने संपुर्ण सिमेंटीकरणाचा मार्गदर्शन ज्यांच्या माध्यमातुन चालतात ते इंडियन रोड कॉंग्रेस आहे, इंडियन रोड कॉंग्रेस या क्रॅक्सबद्दल काय म्हणतात तर इंडियन रोड कॉंग्रेस हे म्हणतात कि, कॉंक्रेट स्लॅबच्या गुणधर्मानुसार आणि तापमानातील बदलानुसार आंकुचन पाहुन क्रॅक्स पडणे हे स्वाभाविक आहे, इट इज नेचरल याच्यात म्हणजे कुठे ही कॉंक्रेटमध्ये क्रॅक्स पडले म्हणजे काम एकदम निकृष्ट झाला, कॉंक्रेटमध्ये क्रॅक्स पडले म्हणजे याच्यामध्ये भ्रष्टाचार झाला यापध्दतीचा नाही. त्यामुळे हे करत असतांना इंडियन रोड कॉंग्रेसने जे नियम सांगीतले त्या नियमाप्रमाणे क्रॅक्स पडलेल्या आहेत काय ? तर त्याचा उल्लेख विभाग प्रमुखांनी करावा, दुसरी गोष्ट ज्यांच्या मार्गदर्शनात आपण चालतो, ज्यांनी या संपुर्ण सिमेंट रोडचा डिजाईन केला आहे, ती व्ही.एन.आय.टी.सारखी संपुर्ण मध्य भारततली मोठी संस्था जी आपल्या नागपूरात आहे त्यांचे अधिकारी, त्यांचे प्रोफेसर इंगळे सर त्यांच्यामार्फत त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम चालु आहे. तीसरा विषय कि ज्यांच्या मार्गदर्शनात जे हे टेस्टींग करतात, संपुर्ण भारतामध्ये कुठल्याही सिमेंट रोडमध्ये काही ही गडबड झाली तर लखनउ असेल, कानपूर असेल, मध्यप्रदेश असेल, या शहरातील लोक त्यांच्या सल्ल्याकरिता नागपूरला येतात. त्या ज्युटेकसारख्या मोठया प्रतितयश संस्थेला आपण संपुर्ण हा जो कार्यक्रम आहे हे तपासण्याचे आदेश दिलेले आहे. आणि त्यांच्या मार्गदर्शनात हे चालु असल्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे कि कुठे तरी नागपूरची बदनामी, आपल्या राजकीय कामासाठी नागपूरचे रस्ते खराब, सिमेंट रोडचे काम निकृष्ट झाले आहे, यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे या पध्दतीचे आरोप करू नये, अशी आपल्याला विनंती करतो.

श्री दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, सत्तापक्ष नेत्यांनी सांगीतले कि कुठल्या तापमानामुळे सिमेंट रोडमध्ये क्रॅक्स झाले. मा.महापौरजी, 12 एम.एम. म्हणजे अर्धा इंच आज 12 एम.एम.नाही, 6–6 इंचीचे क्रॅक्स आहेत, 6–6 इंचीचे क्रॅक्स तापमानामुळे होते काय ? जेथे सिमेंट रोड आहे तेथे अर्धे खडडे आहे, आपण व्ही.एन.आय.टी.कडुन रोड इंस्फ्रास्ट्रक्चर्स आणले असेल तर त्यांनी अमेरीकेतुन घेवुन आणले असेल, त्यांनी प्लॅनिंग बनविली असेल परंतु निरीक्षण प्रशासनाचे आहे.

श्री संजय महाकाळकर :– मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेत्यांनी सांगीतल्याप्रमाणे ज्या टॅक्नीकल ज्यांच्यामार्फत आपण हे काम करून राहिलो आहे, त्यांनी बनविलेली डिझाईन, त्यांनी तपासलेली गुणवत्ता त्या गुणवत्त्यानुसार ही कामे व्हावी, ही निश्चित चांगली गोष्ट आहे. परंतु ती तशी होत आहे कि नाही ही तपासण्याची जबाबदारी कोणाची आहे. याला कोण जबाबदार आहे, त्यांनी सांगीतल्याप्रमाणे जी काही कामे सुरू आहे, आपण बघितले असेल कि वृत्तपत्रामध्ये मागच्या आठवडयात या शहरामध्ये एक सिमेंट रोडच्या कामाची तपासणी करण्यांत आली, मा.पालकमंत्री सुध्दा त्याठिकाणी अचानक पहोचले आणि दोन–तीन दिवसानंतर त्या रोडचे ब्लॉक काढुन काम सुरू करण्यांत आला. का बरा त्या रोडचे ब्लॉक काढण्यात आले.

मुख्य अभियंता(श्री.देबडवार) :– मा.महापौरजी, आता जो सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित झाला होता कि वेस्ट हायकोर्ट रोडचे ब्लॉक काढण्यात आले होते ही गोष्ट खरी आहे. तेथील ब्लॉक काढण्याचे काम

हाती घेण्यांत आले होते, अधिवेशन होते त्यावेळी रोड पुर्ण करून वाहतुकीला तो रोड सुरू करणे गरजेचे होते म्हणुन घाई घाईमध्ये त्या रोडचे काम पुर्ण केले होते. त्या कामाची टेस्टींग पण केली होती आणि जनमंचनी पाहणी केली होती त्यापूर्वी आपल्या खात्याच्या अधिका–यांनी ठेकेदारांशी पत्रव्यवहार केला होता कि अश्या अश्याप्रकारचे ब्लॉक काढुन घेण्यांत यावे, त्या अनुषंगाने ती कार्यवाही झाली आहे. सभागृहात दुसरा प्रश्न उपस्थित झाला होता कि आपल्याला व्ही.एन.आय.टी.ने डिजाईन दिल्यानंतर आपण ते तपासण्याचे काम ज्युटेक संस्थेमार्फत केलेले आहे, ज्युटेक ही नागपूरची संस्था आहे ही पहिली सिव्हील इंजिनिअरची संस्था आहे.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, मा.विरोधी पक्षनेत्यांनी काय प्रश्न विचारला आणि हे काय उत्तर देत आहे. श्री महाकाळकरांनी प्रश्न उपस्थित केला कि मा.पालकमंत्री तेथे गेल्यानंतर त्या रस्त्यांची पुर्नबांधणी करण्यांत आली, याठिकाणी सत्तापक्ष नेता अधिका–यांची बाजु घेत आहे. महापौर प्रशासनाची बाजु घेते म्हणजे आपण त्यांच्या बाजुने आहात काय ?

श्री प्रविण दटके :– मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, कोणी कोणाची बाजु घेण्याची गरज नाही, जे चालु आहे त्याचा उत्तर येत आहे काही अडचणी असतील तर प्रशासन उत्तर देतील. मा. महापौरजी, तालेवार साहेबांनी उत्तर दिले, त्यांना काही प्रश्न विचारावयाचे होते त्यांनी विचारले व तालेवार साहेबांनी त्याचे उत्तर दिले, कोणाची बाजु घेण्याची गरज नाही, घेणार पण नाही त्यामुळे हा ना–हक आरोप लावण्याची गरज नाही, जे बाजु घेत होते ते सर्व सभागृहाच्या बाहेर केव्हाच गेले आहे त्यामुळे ही जी स्थिती आहे, त्यांच्यामुळे झाली आहे त्यामुळे कुठलाही चुकिचा आरोप करू नये. यात जर कोणी दोषी असेल तर त्याला पाठीशी घालण्याची गरज नाही.

मुख्य अभियंता (श्री.देबडवार) :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी प्रश्न असा विचारला होता कि व्ही.एन. आय.टी.ने डिजाईन दिलेली आहे ती योग्य आहे परंतु काम करीत असतांना क्वॉलिटी तपासण्यासाठी आपण काय यंत्रणा केली आहे. अश्याप्रकारचा प्रश्न उपस्थित झाला होता सभागृहामध्ये त्याच्या अनुषंगाने उत्तर देत आहे, ते तपासण्याचे काम आपण ज्युटेक संस्थेला दिले आहे आणि ही ज्युटेक संस्था काय आहे मी त्याचा बॅकग्राउंड आपल्याला सांगतो.

श्री संजय महाकाळकर :– मा.महापौरजी, माझा प्रश्न होता कि, त्या रोडच्या कामाची पाहणी झाली, अचानक पालकमंत्री तेथे पहोचले, त्यानंतर त्या रोडचे ब्लॉक काढुन ते पूर्ववत सुरू करण्यांत आले, जे ब्लॉक लागले होते किंवा रोडचा जो काम झालेला होता तो बरोबर होता किंवा नाही, मग ब्लॉक का काढण्यात आले. याचा स्पष्टीकरण मला देण्यांत यावा.

मुख्य अभियंता (श्री.देबडवार) :– मा.महापौरजी, त्याची चौकशी करून सभागृहामध्ये अहवाल सादर करण्यांत येईल.

श्री संजय महाकाळकर :– मा.महापौरजी, तेथे जनमंचच्या वतीने व संबंधित नागरिकांनी त्या

परिस्थितीमध्ये तो रोड बघितला असेल निश्चितचपणे निकृष्ट दर्जाचा काम झाल्यामुळे ताबडतोब त्या रोडचे ब्लॉक काढुन पूर्ववत करण्यांत आले असे म्हणण्यास काही वावगे होणार नाही. त्या सिमेंट रोडवर पडलेले जे काही क्रॅक्स असेल ब–याच ठिकाणी शहरामध्ये सिमेंट रोडवर क्रॅक्स पडले आहे, ज्युटेकनी पुर्ण क्रॅक्सचे निरीक्षण करून तुम्हास ते क्रॅक्स भरण्याचे आदेश दिले आहेत काय ? डांबर भरून टाका असा काही त्यांनी सांगीतले आहे काय ? असे काही त्यांचे आदेश आहेत काय ?

मुख्य अभियंता (श्री.देबडवार) :– मा.महापौरजी, ज्युटेकनी सांगीतले होते कि, क्रॅक्स आहे ते आब्झर्व करावयाचे आहे आता ते क्रॅक्स भरू नका, परंतु काही ठेकेदारांनी घाई करून ते क्रॅक्स भरले आणि ते भरीत असतांना ......

श्री संजय महाकाळकर :– मा.महापौरजी, अश्या दोषी ठेकेदारांवर आपण काय कार्यवाही करणार आहे, मला हे म्हणावयाचे आहे कि ज्युटेकचा आदेश आल्यापूर्वीच ठेकेदार आपल्या मनाने क्रॅक्स भरतात हे बरोबर आहेत काय ? म्हणजे किती निकृष्ट दर्जाचा काम झाला असेल त्या संबंधित सर्व ठेकेदारांवर आपण निश्चितपणे कार्यवाही केली पाहिजे, त्या सिमेंट रोडचे काम ज्या अधिका–यांच्या मार्फत सुरू असेल समजा त्यात काही नुकसान झाले असेल तर त्या अधिका–यांकडुन नुकसान भरपाई घेतली पाहजे. या सर्व सिमेंट रोड करिता आपण सर्वपक्षीय एक समिती नेमावी, अशी माझी आपणांस विनंती आहे.

महापौर :– आयुक्तांनी नियमानुसार कार्यवाही करावी.

<u>प्रश्न क्रमांक 4</u> :– नेहरुनगर झोन क्र. 5 मधील प्रभाग क्र. 30 मध्ये नळाला मुबलक पाणी येत नसल्याच्या तक्रारी संदर्भात माहिती

श्री संजय महाकाळकर :– मा.महापौरजी, नागपूर शहरामध्ये शहराच्या सर्व लोकांना सुरळीतपणे पाणी मिळावे याकरिता आपण 24/7 ची योजना आणली. परंतु या शहरामध्ये आमच्या प्रभागामध्ये मोठया प्रमाणात मोठा ताजबागचा भाग येतो बरेचशे मुस्लिम बांधव त्या परिसरामध्ये राहतात आज ही त्या परिसरामध्ये एक दिवसाआड पाणी दिल्या जात आहे. आपल्या याच्यात असे कुठे आहे काय ? कि काही भागामध्ये रोज पाणी व काही भागामध्ये एक दिवसा आड पाणी दिले पाहिजे. तेथे ब–याच ठिकाणी नळाची लाईन टाकुन ठेवली आहे परंतु कॅपेक्सचा फंड नसल्याचे कारण सांगुन आज ही नळ कनेक्शन ती कंपनी देण्यांस तयार नाही. छोटया ताजबागच्या परिसरामध्ये मागच्या किती दिवसापासून आपण पाईप लाईनचे काम तेथे सुरू केलेले आहे, तेथे निधि–अभावी कारण सांगुन लोक मिटर घेण्यास तयार असतांना सुध्दा त्यांना मिटर देण्यांत येत नाही. याबाबत आपण कोणावर कार्यवाही करीत आहे, या शहरामध्ये 572–1900 लेआउट आहे, तेथे लाईन चार्ज करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासनी म.न.पा. ला काही पत्र पाठविले आहेत काय ? त्याचा खुलासा करावा.

महापौर :– विभाग प्रमुखांनी उत्तर द्यावे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, मा.विरोधी पक्षनेत्यांचा जो प्रभाग आहे, तो कन्हानच्या पाण्यावर अवलंबुन आहे, मा.सदस्यांच्या प्रभाग हा उंचीच्या भागात असल्यामुळे तेथे पाण्याची टंचाई आहे, तेथे उपाययोजना चालु आहे.

श्री संजय महाकाळकर :— मा.महापौरजी, शहरामध्ये काही भागामध्ये तीन—तीन तास पाणी व काही भागामध्ये एक दिवसाआड पाणी असा प्रावधान आहे काय ? याचा खुलासा करण्यांत यावा.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, असा काही प्रावधान नाही आपल्याला सगळीकडे सारखे पाणी द्यावयाचे आहे, याकरिता आपण 24/7 ही योजना आणली आहे, मा.सदस्यांचा प्रभाग कन्हानच्या टांकीवर शेवटचा भाग आहे आणि तो उंचीवर आहे, तेथे पाणी येण्यास उशिर होतो आपली त्या झोनची 64 एम.एल.डी.ची डिमांड आहे व आपण 50 एम.एल.डी. पाणी देत आहे.

श्री तानाजी वनवे :— मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, मुद्या नेहरूनगर झोनचा आहे, आमच्या ही भाग त्या झोनमध्ये येतो आणि नेहरूनगर झोनमध्ये गेल्या अनेक वर्षापासुन घाण पाण्याची समस्या आहे. लोक काविळने बिमार झाले आहे किर्तीनगर, या भागामध्ये घाण पाणी येत आहे. तेथील लाईन बदलविण्यासाठी आम्ही सांगीतले त्याठिकाणी टॅकरचा पुरवठा कमी जास्त प्रमाणात सुरू आहे. त्याचप्रमाणे हसनबागचा एरीया आहे, दर्शन कॉलनीचा एरीया आहे या भागामध्ये घाण पाणी लोक पित आहे. ही घाण पाण्याची समस्या नेहरूनगर झोनमध्ये आहे आणि तेथील जे अधिकारी असतील, त्यांचा याकडे दुर्लक्ष आहे त्या घाण पाण्याची समस्या ताबडतोब सुटली पाहिजे, ती समस्या सुटत नसेल तर आम्ही संबंधित अधिका—यांच्या विरोधात, घाण पाण्याच्या विरोधात एफ.आय.आर. दाखल करावा काय ? याचे उत्तर आम्हाला ताबडतोब देण्यांत यावे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, ही जी घाण पाण्याची समस्या आहे याचे कारण असे कि जिर्ण झालेल्या पाईप लाईन असतात, अनेक ठिकाणी अवैद्य कनेक्शन असतात, मी एक उदाहरण देत आहे, आम्ही आसीनगर झोनमध्ये गेलो, तेथे संघर्षनगर, राउतनगर, पांडेनगर, याठिकाणी जवळपास 12.4 कि.मी. लाईनवर लोकांनी घर बांधुन ठेवले आहे.

श्री तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आम्ही नेहरूनगर झोनच्या संदर्भात बोलतो, त्याठिकाणी आपण काय करणार आहे. आणि हे आसीनगर झोनचा सांगत आहे, आम्हाला नेहरूनगर झोनमध्ये ज्या पाईप लाईनमधुन पाणी येतात त्यामुळे लोक बिमार झालेले आहे, लोकांना काविळ झालेला आहे, हे पुरावे आमच्या जवळ आहे आणि त्याठिकाणाबद्यल पर्टीक्युलर आपण काय करणार आहे. नेहरूनगर झोनमध्ये ज्या पाईप लाईन आहे त्याबद्यल आपण काय करणार आहे, आणि येथे मा.महाकाळकरजीनी जो प्रश्न विचारला त्याठिकाणी पाणी समप्रमाणात वाटप होत नाही, कुठे एक दिवस येते व कुठे रोज येते, त्याच्या संबंधात कार्यालयानी काही व्यवस्था केलेली आहे काय ? करणार आहे काय ? ही माहिती

आम्हाला देण्यांत यावी.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, आपले दोन प्रश्न आहे एक दूषित पाण्याचा व दुसरा कमी पाण्याचा. मी दूषित पाण्याबद्यल सांगतो, मागे श्रीनगरमध्ये प्राब्लेम येत होता, जुन्या पाईप लाईन होत्या त्याच्यावर लोकांनी घरे बांधली शेवटी त्याठिकाणी पाईप लाईन नवीन टाकावी लागली.

श्री तानाजी वनवे :– मा.महापौरजी, श्रीनगरमध्ये घाण पाणी येत आहे व तेथे 15 दिवसापासून सातत्याने काम सुरू आहे, अजूनही तेथे अळया येणे चालु आहे अजूनही ते बंद झालेले नाही.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, मा.सदस्यांनी किर्तीनगरचा प्राब्लेम सांगितला. आम्ही बघुन घेतो कि तेथे पाईप लाईन रिप्लेस करावी लागेल काय ? रिप्लेस करता येत असेल तर करण्यांत येईल.

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, शहरामध्ये कॅपेक्सनी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकलेल्या आहेत त्या आयआरडीपी च्या नाल्याजवळुन गेलेल्या आहेत. रिस्टोरेशन तर केल्याच नाही, कमीत कमी त्यांना आयआरडीपीच्या नाल्या ज्या पुर्ण भरलेल्या आहेत, त्या साफ करावयास सांगावे, तसाच एक मुद्या उपस्थित करतो कि शहरामध्ये मोठया प्रमाणात सिमेंट रोडचे काम सुरू आहे, त्यामुळे पावसाळयाच्या पूर्वी आयआरडीपी च्या नाल्या साफ करावयास लावण्यात यावे.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, दूषित पानी का मुद्या केवल नेहरूनगर झोन का ही नही बल्कि आसीनगर झोन का भी है। दूषित पानी आसीनगर झोन अंतर्गत भी चारो तरफ बस्तीयो मे आ रहा है, बाळाभाउपेठ, लष्करीबाग यहां पर दूषित पानी की समस्या शुरू है, लगातार ओ.सी.डब्लु.वालो को बोलने के बाद भी उन्होने कई बार हम लोगो से समय लिया उस समय के अंतर्गत उन्होने उस काम को पुरा नही किया । ओ.सी.डब्लु के पास एक बहाना लगातार चल रहा था कि, कॅपेक्स के काम करने के लिये निधी नही होने के कारण हम पानी की समस्या का निराकरण नही कर पा रहे है। मा. महापौरजी, मैं आप से एक बात जानना चाहता हुॅ कि 2014 तक यह बहाना ठिक था, नागपूर महानगरपालिका के पास फंडींग की कमी है पानी पुरवठा नही कर पा रहे थे, लेकिन 2014 के बाद राज्य सरकार भारतीय जनता पार्टी की है, केंद्र सरकार भारतीय जनता पार्टी की है, औैर नागपूर महानगरपालिका भी भारतीय जनता पार्टी के हाथ मे है, जब सारी तरफ सरकार आपकी है तो आपको फंड की कमी कहां से हो रही है। मा.महापौरजी, हमको जनता के सामने जाना पडता है, जनता यह सवाल हमसे बार बार करती है, आज हम जनता के सवाल का जवाब नही दे रहे है, पिछली बार आसीनगर झोन मे पानी के विषय को लेकर निगम आयुक्त के नेतृत्व मे मेळावा लिया गया उस मेळावा मे उन्होने हमसे तीन दिन का समय मांगा, हमने उन्हे 10 दिन का समय दिया, लेकिन पानी की समस्या जैसी की वैसी बनी रही, यह ओ.सी.डब्लु. शहर के अंदर क्या कर रही है, आप हमको इन सवालो के जवाब दे।

श्री दिपक चौधरी :— मा.महापौरजी, नेहरूनगर झोनमध्ये कमी एम.एल.डी. पाणी मिळते आणि ही पाण्याची समस्या आमच्या प्रभागात नेहमीची आहे, आमचा प्रभाग फिडर लाईनवर असलेला भाग आहे. त्या भागामध्ये डायरेक्ट टॅपिंग असल्यामुळे काही पाणी निघुन जाते, त्याच्यावर आजपर्यंत आपण काही ठोस कार्यवाही केलेली नाही, शांतीनगर मधुन इतर काही भागामध्ये फिडर लाईनवर डायरेक्ट टॅपिंग केलेली आहे, त्याठिकाणी डायरेक्ट टेपिंग असल्यामुळे आमच्या टांकी भरत नाही, आमच्या नेहरूनगर झोनमध्ये ज्या टांक्या आहे त्या पुर्णपणे भरण्यात याव्या, त्या तीन टाईम करण्यांत याव्या, अशी आपणांस विंनती आहे. फिडर लाईनवर झालेली डायरेक्ट टेपिंग आहे ती काढण्यात यावी, पोलिस प्रोटेक्शनमध्ये हे काम करण्यांत यावे. आमच्या प्रभागात पाणी नसल्यामुळे लोक आमच्या घरी पाण्यासाठी मोर्चे घेवून येतात, आमची पाण्याची समस्या दुर झाली पाहिजे.

श्री संजय महाकाळकर :— मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही. 572 किंवा 1900 चा जो भाग आहे त्याच्यामध्ये नेटवर्क ओ.सी.डब्लु.च्या माध्यमातुन टाकण्यांत आलेला आहे जेथे पूर्वी महानगरपालिकेच्या माध्यमातुन पाणी पुरवठा होत होता त्या भागात आपण पाण्याची लाईन चार्ज करून घेतली आहे किंवा नाही, त्यासाठी आपल्याला नागपूर सुधार प्रन्यास कडुन पत्र आलेले आहेत काय ?

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :— मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यासनी आपल्याला जवळपास 785 लेआउट हॅन्डओव्हर केले होते, त्यापैकी आपण 725 लेआउट चार्ज केले व उरलेल्या 60 लेआउटमध्ये काही ठिकाणी पाईप लाईन लिक आहेत, आपण त्याचा सर्व्हे केलेला आहे व त्याठिकाणी लाईन चार्ज करण्याची प्रक्रिया सुरू आहे याशिवाय 67 लेआउटमध्ये आपण सर्व्हे करण्यासाठी ओ.सी. डब्लु.ला कळविलेले आहे. हे सर्व्हे झाल्यानंतर याच्यामध्ये ज्या काही त्रुटया आहेत, त्या आपण दुर करू.

श्री संजय महाकाळकर :— मा.महापौरजी, त्या परिसरामध्ये लाईन चार्ज न झाल्यामुळे आपल्याला जवळपास 300 टॅकर रोज पाठवावे लागते. त्याच्यामुळे याचा भुर्दंड हे महानगरपालिकेवर पडतो आहे. आणि आपण ओ.सी.डब्लु.वर त्याबाबत काही कार्यवाही करून राहिले नाही. हया लाईन चार्ज न झाल्याबाबत आपण ओ.सी.डब्लु.वर कार्यवाही केली पाहिजे, तसे आदेश आपण या सभागृहाच्या माध्यमातुन द्यावे.

महापौर :— सर्व सूचना लक्षात घेवून आयुक्तांनी लक्ष घालुन हा प्रश्न मार्गी लावावा.

<u>प्रश्न कमांक 6</u> :— उप्पलवाडी इंडस्ट्रियल एरियातील सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था संदर्भात माहिती

श्री मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, उप्पलवाडी इंडस्ट्रीयल एरीया हे 1964 पासून विदर्भामध्ये प्रथम इंडस्ट्रीयल एरीया होता, आणि तिला महानगरपालिकेनी 1984 मध्ये मान्यता प्रदान केलेली आहे. तिथे मुलभुत सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेचे कार्य राहिले पाहिजे

होते पण तसे झालेले नाही. मला माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले कि जेव्हा कधी निधी उपलब्ध होईल तेव्हा हे काम करण्यांत येईल. निधी उपलब्ध झाला कि नाही याची माहिती देण्यांत यावी.

कार्यकारी अभियंता (श्री भुतकर) :– मा.महापौरजी, उप्पलवाडी इंडस्ट्रीयल एरीयामध्ये सांड पाणी वाहून नेण्याकरिता निधी उपलब्ध झाला नाही. उप्पलवाडीमध्ये यापूर्वी जे काही विकास काम झाले आहे ते शासनाकडुन मिळालेल्या निधीमधुन झालेले आहेत. या प्रकरणी शासनाकडुन निधी उपलब्ध झाला तर सांड पाणी वाहुन घेण्याकरिता प्रकल्प तयार करता येईल.

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, त्या इंडस्ट्रीयल एरीयामधील लोक कमीत कमी दिडसे कोटी रूपये वार्षिक कर भरतात, त्याठिकाणी रस्ते खराब आहे, दिवाबत्तीची सोय नाही, कमीत कमी दिवाबत्तीची सोय व्हावयास पाहिजे. रस्ते तो आपण आपल्या हॉट मिक्समधुन बनवु शकतो आणि त्याठिकाणी सिव्हर लाईन टाकणे गरजेचे आहे, कोणताही व्यक्ती त्या रस्त्यावरून जात असेल तर त्या रस्त्यावर दुर्गंधीयुक्त वास येतो माणुस आपला तोंड झाकुन त्या रस्त्यावरून जातो, आपण स्मार्ट सिटी बनविण्याच्या मागे लागत आहे व दिड कोटी रूपये देणारे जे लोक आहे, त्यांच्याकडे लक्ष देत नाही, ही शोकांतिका आहे. आपण इंडस्ट्रीयल एरीयात मुलभुत सुविधा पुरवु शकत नाही, याच्यावर मार्ग निघाला पाहिजे किंवा वेगळी बैठक लावावयास पाहिजे, यापूर्वी मा.स्थायी समिती अध्यक्ष, श्री अविनाश ठाकरे यांनी बैठक लावली होती, परंतु तेथे काय झाले नंतर हे कळले नाही. म्हणुन आपण हे प्रकरण गंभीरतेने घ्यावे तेथील नागरिकांच्या स्वास्थ्याला धोका निर्माण झाला आहे, 20–25 वर्षापासून नाल्याचे पाणी तेथेच झिरत आहे, तो पाणी दुसरीकडे जात होते आता पुर्ण तो नाला ब्लॉक झालेला आहे, तो दुसरीकडे वळवावा लागेल, पुर्ण चौकशी करून हे प्रकरण मार्गी लावण्यांत यावे.

महापौर :– मा.सदस्य, श्री.मनोजजी सांगोळे यांनी ज्या त्रुटया त्या भागातल्या दाखविलेल्या आहेत, त्याचा अभ्यासपुर्ण दौरा आयुक्तांनी करावा आणि तेथे काय मार्ग निघेल तो काढावा.

<u>प्रश्न क्र. 7</u> :–झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत बनविण्यात आलेल्या इमारती, रस्त्यांची सुविधा, प्रकाश व्यवस्था संदर्भात माहिती.

श्री मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, मला या प्रश्नाचे उत्तर प्राप्त झाले आहे,

त्याठिकाणी जमिन घेते वेळेस ज्या लोकांनी जमिन घेतली तेव्हा तेथे एस.आर.ए.ची स्कीम बनत होती, तेथे सांडपाणी कुठे वाहुन जाणार आहे हे पहावयास पाहिजे होते, तेथे रस्ते नाही, दिवाबत्तीची सोय नाही, आणि हे प्रकरण कोर्टात आहे असे सांगण्यात येते, तेथे दिवाबत्तीची सोय केव्हा होणार आहे, रस्त्यांची सोय केव्हा होणार आहे आणि सिव्हर लाईनची व्यवस्था केव्हा होणार आहे याची माहिती दिली तर बरे होईल. कारण याकरिता राज्य सरकार व केंद्र सरकारकडुन पैसे मिळालेले आहे, त्याची व्यवस्थाही लवकरात लवकर करण्यांत यावी.

महापौर :— विभाग प्रमुखांनी उत्तर द्यावे.

कार्यकारी अभियंता (एस.आर.ए.) :— मा.महापौरजी, नारा स्कीम ही जागा नझुलची होती. बी.एस.यु.पी.मध्ये सावित्रीबाई फुले प्रोजेक्टमध्ये वेळेवर ही जागा जिल्हाधिकाऱ्यांनी उपलब्ध करून दिलेली आहे. त्या जागेवर बांधकाम करण्यांत आलेले आहे, तेथील रस्ता डी.पी. प्लॅनमध्ये एन.आय.टी.ने बांधावयाचा आहे. झोपडपटटी हटविण्याच्या दृष्टीने तेथील लोक बेघर होवु नये याकरिता तातपुरती राहण्याची अरेजमेंट करण्यांत आली होती. जेव्हा नारीचा रस्ता होईल तेव्हा घराचे बांधकाम करण्यांत येईल, सध्यापरिस्थितीत हया रस्त्याची केस गुंठेवारी कायद्या अंतर्गत न्यायप्रविष्ट आहे. याच्यात नारी या रस्त्याचे बांधकाम एन.आय.टी.ने हाती घेतले आहे, या व्यतिरिक्त कामगारनगर से पिवळी नदी या रस्त्याचे बांधकाम महानगरपालिकेने पुर्ण केलेले आहे. तेथुन 200 मिटर अंतरावर हा रस्ता आहे. तेथे तातपुरता रस्ता दुरूस्त करण्यांत आला आहे व एक बोअरवेल पाणी पुरवठयाकरिता चालु आहे. त्याठिकाणी विद्युत कनेक्शन नसल्यामुळे पाणी जात नाही, त्यामुळे म.न.पा.च्या टॅकरनी नागरिकांना पाणी पुरवठा सुरू आहे. इलेक्ट्रीकच्या संबंधातील काम या महिन्यात पुर्ण होतील. त्याचबरोबर सिव्हर लाईन नाही याकरिता सेप्टीक टॅकचे बांधकाम पुर्ण करण्यांत आलेले आहे.

श्री मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, हे प्रकरण कोर्टात सुरू आहे तर न्याय मागणारे आपले जे वकिल आहे त्यांचे नांव सांगितले तर बरे होईल, त्यांच्याशी मी पाठपुरावा करेल.

कार्यकारी अभियंता (एस.आर.ए.) :— मा.महापौरजी, या प्रकरणात मुख्य पार्टी एन.आय.टी. आहे आपण फक्त नॉमीनी आहे.

श्री मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, नागपूर सुधार प्रन्यासमध्ये आपले तीन ट्रस्टी आहे एक आयुक्त साहेब, दुसरे चेअरमन साहेब व तिसरे श्री भुषण शिंगणे हे आहे. यांना सांगा हे प्रकरण मार्गी लावावयास, एन.आय.टी.मधुन जर आपण पाठपुरावा केला असेल तर त्याची एक कॉपी द्या मी पण पाठपुरावा करतो.

कार्यकारी अभियंता (एस.आर.ए.) :– मा.महापौरजी, आम्ही फॉलोअप करीत आहे.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, झोपडपट्टीच्या लोकांचे जीवनमान उंचविण्याकरिता आपण त्यांना तिकडे बसवुन टाकले, आपण त्यांचे जीवनमान उंचावले तर बरे होईल. मी मागे बस सुरू करावयास सांगितली होती ती बस ही आतापर्यत सुरू झाली नाही. झोपडपट्टीच्या लोकांचे जीवनमान उंचावण्याकरिता आपण लवकरात लवकर उपाययोजना केल्या तर बरे होईल. आपल्या सभागृहामध्ये तीन ट्रस्टी बसले आहे यांना ही तुम्ही माहिती दिली तर चांगले होईल व आम्हाला ही माहिती दिली तर आम्ही ही आपल्या लेव्हलवर पाठपुरावा करू.

श्री.मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, झोपडपटटी पुर्नवसन योजने अंतर्गत वांजरा मे. एस.आर.ए.व्दारा स्कीम तयार की गयी। स्कीम तयार होने के बाद वहां पर जिन लोगो को जगह दी गयी है वह लष्करीबाग आंबेडकर परिसर के रेल्वे लाईन के किनारे रहनेवाले लोग है, रेल्वे का बार बार प्रेशर आ रहा है उनको झोपडपट्टी खाली करने के लिये लेकिन वह झोपडपट्टी खाली करने को तयार नही है वह हमको बोलते है कि पहले रस्ता बनाकर दो, पानी पुरवठा शुरू करके दो, सिव्हर लाईन की व्यवस्था करके दो जब जाकर हम वहां रहने जायेगे, यह जो एस.आर.ए. ने स्कीम बनायी है वहां पर सब मुलभुत सुविधा होना आवश्यक है, एस.आर.ए. इस संबंध मे क्या कर रहा है और रेल्वे के साथ उनका क्या कम्युनिकेशन शुरू है, वहां पर हर आये दिन रेल्वे के अधिकारी आते है और झोपडपट्टी खाली करने का बोलते है उनका कहना है कि हमने तुम्हारे लिये क्वॉर्टर बनाये है तुम उन क्वॉर्टर मे जाओ। जबकि वहां पर कोई भी मुलभुत सुविधा नही है इसलिये आप एस.आर.ए. को आदेश दिजीये कि जल्द से जल्द वहां पर मुलभुत सुविधा उपलब्ध करवाई जाये। और वहां पर रहने के बाद लोगो को समस्या का सामना न करना पडे। इस संदर्भ मे आप रूलिंग दे और वहां यह सारे काम जल्द से जल्द पुरे किये जाये।

महापौर :– या विषया अंतर्गत आयुक्तांनी लक्ष घालावे, विभाग प्रमुखांनी सुध्दा याचा अभ्यास करावे रेल्वेशी कॉंट्रक्ट करून त्याचा मार्ग काढावा.

<u>ठराव क्रमांक 20</u>:– <u>विकास योजना – नागपूर (अतिरीक्त क्षेत्र)</u>

मौजा – हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 अन्वये प्रसिध्द झालेल्या योजनेतील प्रस्तावाबाबत प्राप्त झालेल्या

हरकती/सुचनावर विचार करून अहवाल सादर करण्यास्तव उक्त अधिनियमाचे कलम 28 अन्वये समिती गठीत करण्याबाबत.

शासन निर्णय क्र. नामपा–2011/प्र.क्र. 1/नवि–26, दि. 14/05/2013 अन्वये मौजे–हुडकेश्वर (बु.) व मौजे – नरसाळा या महसुली गावांचे 972.82 हे. क्षेत्रा, नागपूर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस–2413/405/प्र.क्र. 213/2013/नवि– 9, दि. 14/10/2013 नुसार, उक्त वाढीव क्षेत्राकरीता, नागपूर महानगरपालिका ही नियोजन प्राधिकरण म्हणुन कार्य करेल असे अधिसुचीत करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 21 ते 30 अंतर्गत नविन विकास योजना तयार करून कलम 30 अंतर्गत मंजुरीकरीता शासनाकडे पाठविण्यास्तव नागपूर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. 234, दि. 20.05.2014 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

मा. सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांनी आदेश क्र. D.P. (Addi area) Nagpur/JDTP/1603, दि. 14.11.2014 अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम – 24 अन्वये सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर यांची नगर रचना अधिकारी म्हणुन नेमणुक केलेली आहे व मा. आयुक्त, म.न.पा. नागपूर यांनी पत्रा क्र. मनपा/नरवि/1409, दि. 03.12.2014 अन्वये ''नगर रचना अधिकारी'' यांचे नियुक्तीस मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेव्दारा नियुक्त मे. मोनार्च सर्व्हेअर्स ॲंड इंजिनिअरींग कन्सल्टंट्स प्रा.लि. यांनी तयार केलेला प्रारूप विकास योजना आराखडा सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, नागपूर तथा नगर रचना अधिकारी यांनी दि. 02.09.2016 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस सादर केलेला आहे.

त्याअनुषंगाने मनपा साधारण ठराव क्र. 337, दि. 06.10.2016 ला सभागृहाची मंजुरी प्राप्त असून मौजा –हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या अतिरीक्त क्षेत्राचा प्रारूप विकास योजना आराखडा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 (1) अन्वये शासन राजपत्रात दि. 28.11.2016 ला प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर व दोन स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात दि. 29.11.2016 ला प्रसिध्द झालेले आहे. त्यानुसार प्रसिध्द झालेल्या प्रारूप विकास योजना आराखडयावर एकुण 122 अर्जान्वये दि. 27.01.2017 पर्यंत म्हणजेच विहीत मुदतीत व दि. 27.01.2017 नंतर एकुण 2 हरकती /सुचना अर्ज विभागाकडे प्राप्त झालेले आहेत.

म.न.पा. साधारण ठराव क्र. 337, दि. 06.10.2016 अन्वये ''प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेसाठी विहीत मुदतीत प्राप्त हरकती/सुचना मागवीणे, प्राप्त हरकती व सुचनावर सुनावणी घेण्यास्तव नियोजन समिती गठीत करणे व सुनावणी घेवुन सुनावणी अहवालासह प्रारूप विकास योजना कलम 30 अंतर्गत शासनाकडे मंजुरीकरीता सादर करण्यासाठीच्या प्रारूप विकास योजना संबंधीची संपुर्ण कार्यवाहीसाठी मा. आयुक्त महानगरपालिका यांना अधिकार प्रदान केलेले आहेत.''

तसेच, प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेसाठी विहीत मुदतीत प्राप्त हरकती/सुचनावर निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 28 अन्वये नियोजन समिती गठीत करणे आवश्यक आहे. यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 28 मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**''कलम 28 (1) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, कलम 26, पोट– कलम (1) अन्वये विकास परवानगी दिलेल्या मुदतीमध्ये, नियोजन प्राधिकरणाकडे किंवा उक्त अधिकाऱ्याकडे विकास योजनेच्या मसुद्यासंबंधात, जर कोणतीही व्यक्ती, कोणतीही लेखी सूचना किंवा आक्षेप पाठविल तर नियोजन प्राधिकरणास किंवा उक्त अधिकाऱ्यास नियोजन समितीचा पोट –कलम (2) अन्वयेचा अहवाल व त्यांच्याकडे आलेल्या सुचना किंवा आक्षेप या गोष्टींचा विचार केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशा रितीने, योजनेत फेरबदल किंवा बदल करता येईल.**

**2) नियोजन प्राधिकरण किंवा उक्त अधिकारी, त्याच्याकडे आलेले सर्व आक्षेव व सूचना "[नियोजन प्राधिकरणाच्या स्थायी समितीचे तीन सदस्य आणि ज्यांना नगर आणि प्रदेश रचना किंवा पर्यावरण यांच्याशी किंवा दोन्हीशी संबंधीत असणाऱ्या बाबींचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव आहे अशा, [ नगररचना संचालकाने नियुक्त केलेले , चार पेक्षा अधिक नसतील इतक्या आणखी व्यक्ती यांचा समावेश असलेल्या ]" नियोजन समितीकडे विचारार्थ व अहवालासाठी पाठविल.**

**परंतु, ज्याबाबतीत नियोजन प्राधिकरण हे स्थानिक प्राधिकरण नसेल त्याबाबतीत, नियोजन समितीमध्ये नियोजन प्राधिकरण ठरवील असे सदस्य असतील.''**

करीता प्राप्त झालेल्या हरकती व सुचना नियोजन समितीकडे विचारार्थ व अहवालासाठी पाठविण्यास्तव नियोजन प्राधिकरणाच्या मा. स्थायी समितीचे तिन सदस्य यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 28 अन्वये मा. स्थायी समितीचे तिन सदस्य नियोजन समितीत नियुक्त करणेस्तव मा. सदस्य यांची नावे सुचविण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन स्थायी समितीच्या तीन सदस्यांची नावे देण्याचे अधिकार हे सभागृह मा.महापौरजी यांना प्रदान करते या सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 21:–</u>** मौजा–नागपूर येथिल नगर भुमापन क्र. १४८, कल्याणेश्वर मंदिर रोड, महाल झेंडा चौक येथिल श्री. गोविंद श्रीकांत पाठक यांना महानगरपालिके तर्फे ३० वर्षाचे भाडेपट्ट्यावर देण्यात आलेल्या भुखंडाला लागून असलेली अतिरिक्त ३८.१४ चौ.मी. जागा नगर रचना दरानुसार प्रिमियम रु. १२,३३,२१४/– व त्यावर २.५ टक्के ग्राऊंड रेंट रु. ३०,८३०/– प्रती वर्ष आकारुन ३० वर्षाचे स्थायी भाडेपट्ट्यावर देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी प्रश्न असा आहे कि, 30 वर्षाकरिता श्री.गोविंद श्रीकांत पाठक यांना भाडेपट्यावर भुखंड वाटप करण्यांत आला होता, तो भुखंड वाटप करतांना त्याचा उपयोग काय होता. कोणत्या उपयोगासाठी तो भुखंड वाटप करण्यांत आला होता.

स्थावर अधिकारी (श्री.भुते) :– मा.महापौरजी, हा जो भुखंड आहे तो रहिवाशी वापराकरिता भाडेपटट्‍ीवर देण्यांत आला होता.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, भाडे पटटेवर देण्यांत येणारा भुखंड विकता येवु शकते काय ? त्याची माहिती देण्यांत यावी. एखाद्या व्यक्तिला महानगरपालिकेनी जागा लिजवर दिली, ती लिजवर दिलेली जमिन त्याला विकता येवु शकते काय ?

स्थावर अधिकारी (श्री.भुते) :– मा.महापौरजी, भाडेपटट्‍याच्या संदर्भात जो करारनामा करण्यांत येतो त्यामध्ये अशी अट असते कि, भुखंड विकता येवु शकत नाही, महानगरपालिकेची अनुमती घेवुन ट्रान्सफर करता येवु शकते.

श्री संदिप सहारे :– मा.महापौरजी, आपण श्रीकांत पाठकला ही जमिन दिली होती त्यांनी ही जमिन दुसऱ्याला विकलेली आहे, असे फाईलमध्ये नमुद आहे आणि ही जमिन विकल्यानंतर त्यांनी त्याची रितसर रजिस्ट्री केली आम्ही एखाद्याला उपयोगाकरिता महानगरपालिकेची जमिन द्यावी व त्यांनी ती जमिन दुसऱ्याला विकावी हा कुठला प्रकार आहे. अशी जमिन विकता येत नाही, असे आता सांगण्यात आले मग त्यांनी ती जमिन का विकली. आपण जी जमिन दिली तो आता प्लॉट झाला व अश्या व्यक्तिला आपण त्याच्या बाजुची जमिन देत आहे. यामुळे आपण महानगरपालिकेचे किती मोठे नुकसान करीत आहे हे सिध्द होत आहे आणि म्हणुन हा जमिन देण्याचा जो प्रश्न आलेला आहे तो परत पाठवावा. आणि त्यांनी ज्याप्रकारे त्या भुखंडाची विक्री केली त्यांना त्यावेळेस म.न.पा.ने हे भुखंड काही लाखात दिले असेल त्या भुखंडावर त्यांनी लाखो रूपये कमाविले म्हणजे आपण त्यांना राहण्याकरिता व दुसऱ्या उपयोगाकरिता भुखंड दिले व त्यांनी त्याचा सौदा करावा व पैसे कमवावे हे बरोबर नाही. म्हणुन त्यांना दिलेली जी लिज आहे ती रद्य करून त्यांच्याकडुन भुखंड परत घ्यावा.

श्री संदिप जोशी :– मा.महापौरजी, ही एक केस नाही महानगरपालिकेमध्ये बाजार विभागामध्ये अशा पध्दतीच्या अनेक केसेस आहे की ज्यामध्ये महानगरपालिकेकडुन 100 रुपये घेण्यात येते आणि तो भुखंड दुसऱ्याला 500 रुपयामध्ये विकण्यात येतो आणि महानगरपालिकेकडे 50 रुपये भाडे भरण्यात येते. या शहरामध्ये अशा पध्दतीचे अनेक उदाहरणे आहे त्यामुळे संदीप सहारे यांनी जो विषय ठेवला तो अत्यंत चांगला विषय ठेवला. माझी या सभागृहामार्फत आपणाला विनंती आहे की, या संपुर्ण प्रकरणाची अति.आयुक्त कुंभारे

या विभागाचे हेड आहे असे मला वाटते त्यांच्यामार्फेत संपुर्ण चौकशी करण्यात यावी आणि चौकशीच्या अहवालावर कारवाई करण्याचे संपुर्ण अधिकार हे सभागृह मा.महापौरांना देते

वरील चर्चेनंतर मौजा—नागपूर येथिल नगर भुमापन क्र. १४८, कल्याणेश्वर मंदिर रोड, महाल झेंडा चौक येथिल श्री. गोविंद श्रीकांत पाठक यांना महानगरपालिके तर्फे ३० वर्षाचे भाडेपट्ट्यावर देण्यात आलेल्या भुखंडाला लागून असलेली अतिरिक्त ३८.१४ चौ.मी. जागा नगर रचना दरानुसार प्रिमियम रु. १२,३३,२१४/— व त्यावर २.५ टक्के ग्राऊंड रेंट रु. ३०,८३०/— प्रती वर्ष आकारुन ३० वर्षाचे स्थायी भाडेपट्ट्यावर देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या संपुर्ण प्रकरणाची अतिरिक्त आयुक्त श्री.कुंभारे यांच्यामार्फत चौकशी करण्यात यावी त्या चौकशीच्या अहवालावर कारवाई करण्याचे संपुर्ण अधिकार हे सभागृह मा.महापौरजी यांना प्रदान करते या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 22</u>:—** श्री.प्रकाश येमदे, कनिष्ठ अभियंता, यांचा दि. 29/07/2010 28/12/2015 पर्यंत एकुण 5 वर्षे 4 महिने अनधिकृत गैरहजर असल्यामुळे त्यांचा गैरहजर कालावधी सर्व प्रयोजनार्थ गैरहजर गृहीत धरून व रूजु झाल्यावर 2 वर्षीक वेतनवाढी थांबविण्यात येईल या अटीवर त्यांना रूजु करून घेण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून श्री.प्रकाश येमदे, कनिष्ठ अभियंता यांना संपुर्ण 5 वर्ष 4 महिन्याच्या कालावधीसाठी एकाही पैशाचे पेमेंट देण्यात येवु नये, "नो वर्क नो पेमेंट" हे निकष ठरवुन उर्वरीत 2 वर्षाची वेतनवाढ थांबविण्यात यावी या मा.सत्तापक्षनेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 23</u>:—** प्रकल्प अंमलबजावणी कक्षात कार्यरत सार्वजनिक आरोग्य अभियंता यांच्या सेवांना मुदतवाढ देण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम अंतर्गत केन्द्र षासनाच्या मार्गदर्षक तत्वानुसार प्रकल्प अंमलबजावणी कक्षाची स्थापना प्रकल्प अंमलबजावणी, कार्यान्वयन व देखरेखीकरीता करीता करण्यात आली आहे. प्रकल्प अंमलबजावणी कक्षात सार्वजनिक आरोग्य अभियंता म्हणून श्री. संदीप लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महासभेने ठराव क्र. 292, दिनांक 30.11.2011 अन्वये मार्च 2017 पर्यंत त्यांच्या सेवांना मुदतवाढ दिलेली आहे. केन्द्र व राज्यषासनाच्या पाणीपुरवठा, मलनिःस्सारण व पर्यावरण विषयक प्रकल्प राबविण्याचा त्यांना अनुभव आहे. केन्द्र व राज्यषासनाने केलेल्या अमृत योजना, नागनदी पुनरुज्जिवन प्रकल्प, हुडकेष्वर नरसाळा पाणी पुरवठा प्रकल्प मंजूर केले आहे. सदर प्रकल्पांची अंमलबजावणी व कार्यान्वयन करीता केन्द्र व राज्यषासनाच्या योजनांची माहिती असलेले अनुभवी मनुष्यबळ महानगरपालिकेस लागणार आहे.

सबब, सार्वजनिक आरोग्य अभियंता यांना केन्द्र व राज्यषासनाच्या पाणीपुरवठा,

मलनिःस्सारण व पर्यावरण विषयक प्रकल्प राबविण्याचा अनुभव असल्यामुळे श्री. संदीप लोखंडे यांच्या सेवांना मार्च 2017 पासून पुढील पाच वर्षाकरीता (मार्च 2022 पर्यंत) मुदतवाढ देण्याचा प्रष्न सभागृहाने विचारात घेवून त्यांना 31 मार्च 2017 पासून पुढील पाच वर्षाकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात येते

तसेच महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) रिक्त पदावर शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांचे समायोजन करण्यात यावे. या मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 24</u>:— महानगर (नागरी क्षेत्र) वृक्ष संवर्धन अधिनियम, 1975 मधील कलम 3(1) अन्वये कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 महानगरपालिकेच्या सदस्यांची वृक्ष प्राधिकरणीवर नियुक्ती करण्याचा तसेच या प्राधिकरणीचा कार्यकाळ निश्चित करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवुन समिती गठीत व कालावधी निश्चित करण्याचा अधिकार मा.महापौरजी यांना प्रदान करण्यात यावा. या मा. सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 25</u>:— महानगरपालिकेतील मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना वरील खर्च योग्य प्रकारे होते किंवा नाही याकडे लक्ष वेधण्यासाठी नगरसेवकापैकी जे नगरसेवक मागासवर्गीयांतील असतील अशा सदस्यांची एक दुर्बल घटक समिती गठित करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

निगम सचिव :— मा.महापौरजी, महानगरपालिकेत दुर्बल घटक समितीचे गठन करावयाचे आहे. म.न.पा. ठराव क्र.171 दि. 27.08.1986 अन्वये ही 11 सदस्यांची समिती असते या समितीमध्ये भारतीय जनता पार्टीचे 8 मा.सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या 2 मा.सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे तसेच बहुजन समाज पक्षाच्या एका मा. सदस्यांचे नामनिर्देशन करावयाचे आहे. मी मा.सत्तापक्ष नेता, मा.विरोधी पक्षनेता व मा.गटनेता, बहुजन समाज पार्टी यांना विनंती करतो की, त्यांनी आपल्या पक्षातर्फे सादर करावयाचे नामनिर्देशन पत्रे मा.महापौरजी यांना सुपुर्दे करावे

महापौरः— मा.गटनेत्यांनी दुर्बल घटक समिती करिता सदस्यांची नावे मला सादर करावी.

(मा.सत्तापक्षनेता यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांच्याकडे सादर केला.)

(मा.विरोधी पक्षनेता यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांच्याकडे सादर केला.)

(मा.गटनेता बहुजन समाज पार्टी यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांच्याकडे सादर केला.)

मा.महापौरजी यांनी गट नेत्यांकडुन सादर करण्यात आलेले बंद लखोटे उघडुन मा.सदस्यांची नावे वाचण्याकरिता निगम सचिव यांना दिले.

निगम सचिव :— मा.महापौरजी, दुर्बल घटक समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे पक्षनेता/गट नेता यांनी जी नावे सादर केली आहे ती मी वाचुन दाखवितो.

1. श्री.महेंद्र धनविजय :— अध्यक्ष
2. श्री.नागेश मानकर
3. श्रीमती शकुंतला पारवे
4. श्री.अनिल गेंडरे
5. श्रीमती लिला हाथीबेड
6. श्रीमती निरंजना पाटील
7. श्रीमती शिल्पा धोटे
8. श्रीमती नसिम बानो इब्राहीम खान

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षनेत्यांनी दुर्बल घटक समिती करिता जी दोन मा.सदस्यांची नावे सादर केली आहे ती मी वाचुन दाखवितो.

1. श्रीमती उज्वला वसंतराव बनकर
2. श्री.परसराम काशीनाथ मानवटकर

बहुजन समाज पक्षनेत्यांनी दुर्बल घटक समिती करिता एका मा.सदस्यांचे नाव सादर केले आहे ते मी वाचुन दाखवितो.

1. श्री.जितेंद्र घोडेस्वार

महापौर :— दुर्बल घटक समिती करिता खालीलप्रमाणे सदस्यांची नियुक्ती करण्यात येते या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1. श्री.महेंद्र धनविजय :— अध्यक्ष
2. श्री.नागेश मानकर
3. श्रीमती शकुंतला पारवे
4. श्री.अनिल गेंडरे
5. श्रीमती लिला हाथीबेड
6. श्रीमती निरंजना पाटील

7. श्रीमती शिल्पा धोटे
8. श्रीमती नसिम बानो इब्राहीम खान
9. श्रीमती उज्वला वसंतराव बनकर
10. श्री.परसराम काशीनाथ मानवटकर
11. श्री.जितेंद्र घोडेस्वार

<u>ठराव क्रमांक २६</u>:— केंन्द्र सरकारच्या शहरी विकास मंत्रालयातर्फे प्राप्त पत्राच्या अनुषंगाने (दि. २१ मार्च २०१७ चे पत्र संलग्न) प्रत्येक शहरातून ५ जून 'जागतिक पर्यावरण दिन' पासून प्रत्येक घराघरातून गोळा करण्यात येणारा कचरा विलगीकरण करुन म्हणजे सुका कचरा व ओला कचरा गोळा करावयाचा आहे. याकरीता रहिवाश्यांकडे दोन कचरा डब्बे (डस्ट बिन्स) असावेत. ओल्या कचऱ्यासाठी हिरव्या रंगाचा व सुक्या कच—यासाठी निळया रंगाचा डब्बा असावा, असे डस्ट बिन्स नागरीक खरेदी करु शकत नाहीत असे वाटल्यास मनपाने पुरवावेत असे पत्रात नमुद आहे.

केन्द्रीय शहरी विकास मंत्रालयाने डस्ट बिन्सचा आकार व किंमत ठरवून दिली आहे असे डब्बे DGS&D दरकरारावर उपलब्ध असल्याचेही कळविले आहे. किती डब्बे खरेदी करायचे त्याबाबत खरेदीची ऑर्डर केन्द्रीय शहरी विकास मंत्रालयाकडे नोंदवणे अथवा मनपाने DGS&D दरावर खरेदी करणे असे पर्याय शासनाने सुचविले आहेत. त्यानुसार त्यांच्या किंमती अनुक्रमे १० लिटर —६६ रुपये व ७९.२० रु.,झाकणासह १० लिटर—१०५ रु, झाकणासह १२ लिटर—१२४ रु,झाकणासह २० लिटर क्षमता — रु. २२० असे दर असून शासनाने दिलेल्या बिन्सच्या पर्यायांपैकी घरगुती वापरासाठी १२ लिटर क्षमतेचा झाकणासहीतचा बिन योग्य वाटतो. ते बिन्स घेतल्यास खालीलप्रमाणे पर्याय सुचविण्यात येत आहेत.

१. शहरातील ५.५ लक्ष घरे/दुकानांसाठी प्रत्येकी दोन प्रमाणे सुमारे ११ लक्ष बीन्स घ्यावे लागतील व समजा रु. १२४ दराने खरेदी करावयाचे असल्यास १३.६४ कोटी रुपये खर्च येईल.
२. सर्व ५.५ लक्ष घरांना एक बिन मोफत व एक बिन सशुल्क पुरविल्यास रु. ६.८२ कोटी खर्च येईल.
३. केवळ स्लम मधे बिन्स पुरवावयाचे असल्यास ४ लक्ष बिन्ससाठी प्रत्येकी रुपये १२४ प्रमाणे रु. ४.९६ कोटी खर्च येईल.

वरीलपैकी पर्याय विचारात घेता केवळ स्लम मधील नागरीकांना मोफत बिन्स पुरविण्याचा पर्याय योग्य वाटत असून उर्वरीत उदा. फ्लॅट सिस्टीमच्या इमारती, दुकाने, बंगलाधारक ईत्यादी त्यांचे स्वखर्चाने दोन रंगाचे बिन्स ठेवण्याचे सुचविणं योग्य राहील.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव धोरणात्मक निर्णयार्थ सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.संदीप सहारे :— मा.महापौरजी, एक चांगला विषय आणलेला आहे त्याबद्यल आपले धन्यवाद. कारण मागील दिवसामध्ये केंद्र सरकारनी पुरस्कार जाहिर केला होता आणि नाईलाजाने म्हणावे लागेल कि एकेकाळी नागपूर शहर टॉप 10 मध्ये राहत होता, आता 137 नंबरवर गेला आहे. मा.महापौरजी, आम्ही अनेक सुविधा नागपूर महानगरपालिकेतर्फे नागपूर शहराच्या स्वच्छता व सुंदरते करिता पुरवित असतो आणि आपला नारा ही आहे "स्वच्छ नागपूर, सुंदर नागपूर" याकरिता अनेक कोटी रूपये आपण खर्च करतो. मोठ—मोठया येथे एजंसी दिलेल्या आहेत, आमच्या नागपूर शहरात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. ही आपल्याकरिता शर्मेची गोष्ट आहे केंद्र सरकारनी ओला कचरा व सुखा कचरा ठेवण्याकरीता डस्टबीन घेण्याचा प्रावधान दिलेला आहे, आता मला एक सांगा कि हा कचरा आपण वेगवेगळा केला तर या कच—याचा उपयोग काय आहे.

महापौर :— विभाग प्रमुखांनी माहिती द्यावी.

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :— मा.महापौरजी, ओला कचरा व सुखा कचऱ्यांच्या संदर्भात ओला कचरा जो आहे त्याच्यावर शास्त्रोक्तपध्दतीने प्रक्रिया केली जाईल. त्या कचऱ्यातुन विज निर्मितीचा प्रकल्प उभारण्याकरिता महानगरपालिकेनी करारनामा केला आहे.

श्री जुल्फेकार अहमद भुटटो :— मा.महापौरजी, "स्वच्छ नागपूर, सुंदर नागपूर" यह हमारे लिये गर्व की बात थी कि हमारा शहर टॉप 10 मे था। और आज 137 नंबर पर हमारा शहर चला गया यह अच्छी बात नही है। और इसमे हमने देखा कि स्लम एरीया मे लास्ट 15 सालो मे बिल्कुल कुछ काम नही हुआ है। अभी मोमिनपुरा से लेकर पांचपावली तक, अंसारीनगर से लेकर बोरीयापूरा तक, नालसाब से लेकर गोलीबार चौक तक अगर आप हेल्थ विभाग की टिम भेजेगे तो 1 हजार चेंबर जो गडर के पानी के और सिव्हर लाईन के है वह पुरे लबालब आप को भरे दिखेगें। जिसकी वजह से हजारो लोगो के घरो मे गंदा पानी इंट्री कर रहा है और लोग बिमार हो रहे है और दवाखाना जा रहे है हजारो लोग ज्वाईंडीस के पेशंट बन रहे है। और आज हमारा नागपूर टॉप 10 से निकलकर 137 वे नंबर पर चला गया। जहां पर हमने रोड के काम किये है हमारा काम को विरोध नही है लेकिन जहां इन कामो की आवश्यकता थी वहां पर हमने यह काम नही किये है। सेंट्रल नागपूर मे आपने कितने काम किये जो पुरे नागपूर का सेंटर है वहां पर हमने कितने काम किये। क्या सेंटर के लोग हमारे यहां टॅक्स नही देते क्या योजना के तहत हमारे यहां फंड नही आता । हमारे उस भाग को छोडकर फंड का युटीलाईज करने की पॉलिसी है क्या ? इस ओर प्रशासन को ध्यान देना होंगा मैं महापौरजी आपसे अनुरोध करता हुॅ कि इस प्रकार के जो काम चल रहे है उसकी ओर ध्यान देकर सेंटर नागपूर मे बढिया से बढिया काम किये जाये। गिनती मे आज हम 137 वे नंबर पर चले गये उस नंबर को हमे वापस लाना पडेगा। यह मेरी आपसे विनंती है।

श्रीमती उज्वला बनकर :— मा.महापौरजी, सुंदर नागपूर स्वच्छ नागपूर हे एक स्लोगन आहे. परंतु अनेक वर्ष झाले नागपूर शहर स्वच्छ दिसत नाही. आपण फक्त नारा देतो, 2002 मध्ये कॉग्रेस पक्षाचे सरकार होते त्यावेळेस नागपूर शहर हे सुंदर नागपूर स्वच्छ नागपूर होते. त्यावेळी संपुर्ण नागपूर शहराचा कचरा गोळा करून एंटी चेंबरमध्ये टाकण्यांत आला होता. आज नागपूर शहर हे 137 वे नंबरवर गेले आहे. आता आम्हाला प्रश्न पडला आहे कि आपण कुठुन कचरा गोळा करता, आपण कचरा गोळा करून कुठे टाकायचा आज अनेक नाल्या तुंबलेल्या आहे, गडर लाईन चोकेज झालेल्या आहेत, आज एकीकडे आपण स्वच्छ नागपूर सुंदर नागपूर म्हणतो परंतु नागपूर शहर कुठे स्वच्छ दिसत नाही. आम्हाला दोन अडीच लाखांचा फंड मिळतो त्यात हे काम करणे शक्य नाही, आमच्या प्रभागात येवुन बघा गडर लाईन किती चोकेज झालेल्या आहेत. सिव्हर लाईनची समस्या आहे आणि सगळयात मोठी समस्या सिव्हर लाईनची आहे जोपर्यंत सिव्हर लाईनची समस्या हल होत नाही तोपर्यंत नागपूर शहर स्वच्छ व सुंदर होवु शकत नाही. आज घाण लोकांच्या घरासमोर राहते आणि ती घाण जेव्हा साचते ती स्वास्थ्यासाठी हानिकारक होते, तेथे आपण उभे सुध्दा राहु शकत नाही. आणि स्लम एरीयात तर पुर्ण गडर लाईन घराच्या समोर असते मग माणुस काय करणार आहे. हे जे छोटे छोटे प्राब्लेम आहे ते आधी सॉल्व झाले पाहिजे, गडर लाईन साफ झाल्या पाहिजे, घाण लोकांच्या

घरासमोर रहावयास नाही पाहिजे, ही घाण आपण साफ करू शकलो तर चांगले होईल, कचरा तो आपण गोळा करतोच आहो, ही जी घाण आहे याकडे लक्ष दिले पाहिजे. ती साफ केली पाहिजे तेव्हाच हे नागपूर शहर स्वच्छ होईल, असे मला वाटते.

श्री मोहम्मद जमाल :– मा.महापौरजी, यह स्वागतयोग्य विषय है परंतु नागपूर शहर की जिम्मेदारी जिस संस्था को दी गयी है, क्या वह संस्था पुरे सही तरीके से उसका निर्वाह कर रही है। कनक रिर्सोसेस एक दिन के आड, दो दिन के आड अपनी गाडियो से लोगो के घर का कचरा उठाता है। ठिक है हमे गिला कचरा और सुखा कचरे के लिये दो डब्बे देने वाले है क्या वह दो डब्बे से इस कचरे की समस्या हल होंगी। इस बात की ओर ध्यान देना चाहिये क्योंकि सबसे बडी समस्या यह है कि कनक के पास कई एरीया मे कचरा उठाने के लिये आवश्यक मेनपावर्स की कमी है, हमने कई बार कनक रिर्सोसेस से इस बारे मे बात की है वह कहते है कि हमारा मेनपावर्स बरोबर है जब मेनपावर्स बरोबर है तो सभी एरीयो मे गाडी जाना चाहिये, उनकी गाडीयो एरीया मे रोज नही जा रही है इस वजह से लोग अपने घर का कचरा घर के किनारे या फिर मैदान के किनारे लाकर डाल रहे है। फिर वह कचरा उठाने के लिये नागपूर महानगरपालिका के पास उतना अतिरिक्त मेनपावर्स नही है कि वह पडा हुआ कचरा उठाकर उसकी डम्पींग यार्ड मे विल्हेवाट लगा सके। मैंने कनक रिर्सोसेस को पुछा कि आपके पास एक एरीया के अंदर कितने घरो मे एक गाडी घुमना चाहिये उन्होने मेरे उस सवाल का जवाब अभी तक मुझे नही दिया। जब मैंने कर्मचारीयो से पुछा तो उनका कहना है कि हमारे पास वर्कलोड ज्यादा है इसलिये हम एक दिन मे एक एरीया पुरा नही कर सकते इसलिये अल्टरनेट दिन हम आते है। मा.महापौरजी, मेरी आपसे विनंती है कि आप इस विषय पर ध्यान देकर कनक रिर्सोसेस का मेनपावर्स जो वाहन चल रहे है उसकी एक यादी प्रकाशित करके हमे दिजीये ताकि हम अपने प्रभाग के अंदर सर्व्हे करके यह समझले कि हर एरीया मे गाडी जा रही है क्या नही । यह समस्या हमारे सामने बार बार आ रही है इसलिये आप कनक को आदेश दिजीये और यह विषय क्रमांक 23 पुरी तरीके से सार्थक साबित हो, विषय ऐसा है कि हम घर घर जाकर कचरा जमा करने के डब्बे पहोंचा देगें और लोगो को बतायेगें कि इसमे गिला कचरा डालो इसमे सुखा कचरा डालो, लेकिन वह कचरा उठाने की जिसकी जिम्मेदारी है उन्होने अपना काम सही तरीके से करना चाहिये।

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, विषय क्रमांक 23 यह स्वागत योग्य विषय है। और इसमे सुखा और गिला कचरा जमा करने की बात कही गयी है। आप साडे पांच लाख प्रापर्टीस को डस्टबीन वितरीत करनेवाले है। आज इस शहर की जनता भलेही डस्टबीन का वापर न कर रही हो, वह अपने घर के मे कचरा एकत्रित करती है। लेकिन हमारे बंधुने जो कहां है मैं उनकी बात का समर्थन करती हुॅं, हर घर से कचरा एकत्रित करनेवाले जो कचरा गाडी है कनक रिर्सोसेस कंपनी क्या वही इस डस्टबीन का कचरा उठायेगी ? इस बात का पहले हमको जवाब दिजीये और अगर कनक रिर्सोसेस मेनेजमेंट कंपनी यह कचरा उठायेगी तो वह क्या गिला कचरा अलग गाडी मे ले जायेगी और सुखा कचरा अलग गाडी मे ले जायेगी। अगर जो यह कचरा अलग अलग गाडीयो मे ले

जायेगी तो उसके लिये महानगरपालिका से उस कंपनी को ज्यादा फंडींग करना ह क्या ? यह बताइये। क्योंकि हम जानते है मैं एक ऐसे क्षेत्र का प्रतिनिधीत्व करती हुॅं जो मध्य भारत का प्रमुख व्यापारी क्षेत्र है, और ज्यादा कचरा जमा होनेवाला इलाका है जब हम कचरा उठाने के बारे मे बोलते है तो वह कहते है कि मॅडम दो टाटा एस है, एक उधर बिझी है तो यह सारी बातो का पहले मुझे जवाब दिजीये उसके बाद मैं अपना विषय रखती हुॅं।

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :– मा.महापौरजी, कनक रिर्सोसेस कंपनीशी आपण करारनामा केलेला आहे त्यानुसार ओला कचरा व सुखा कचरा वेगवेगळया वाहनाच्या माध्यमातुन डंपींग करून डंपीगयार्ड पर्यंत घेवुन जावयाचे आहे. ज्यावेळी नागरिक आप–आपल्या घरात ओला कचरा व सुखा कचरा गोळा करण्यांस सुरूवात करतील त्यावेळी ओला कचरा स्वतंत्र वाहनामार्फत त्याला ग्रीन लाईन म्हणतो तो डंपीगयार्ड पर्यंत नेण्यात येईल आणि सुखा कचरा किती निर्माण होतो याचा अभ्यास करून सुखा कच–याची स्वतंत्र वाहनात व्यवस्था करण्यांत आलेली आहे. ओला कचरा सुखा कच–याची नागरिकांनी विगतवारी करण्यास सुरूवात केली तर एकच वाहनातुन त्याची वाहतुक केली जाणार नाही. मी पहिलेच सांगीतले आहे कि ओल्या कच–यापासुन शास्त्रोक्तपध्दतीने उर्जा प्रकल्प राबविला जाईल व सुखा कचरा जो आहे, याच्यावर वेगळी प्रक्रिया केली जाईल. बांधकाम साहित्य जे निर्माण होतात त्याच्यावर वेगळी प्रक्रिया केली जाईल, प्लॉस्टीकवर वेगळी प्रक्रिया केली जाईल, पर्यावरण विषय जे कायदे आहे त्या कायदयाच्या अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी वेगवेगळया पांच प्रकारचे नियम तयार करण्यांत आलेले आहे. सुरूवातीला घनकचरा व्यवस्थापन नियम सन 2000 मध्ये तयार करण्यांत आले होते आता मात्र घनकचरा व्यवस्थापन नियम अंतर्गत प्लॉस्टीकसाठी वेगळे नियम, ई–वेस्टसाठी वेगळे नियम, बांधकाम वेस्ट जे आहे त्यासाठी वेगळे नियम अश्या पांच प्रकारचे वेगवेगळे नियम हे पर्यावरण कायद्याच्या अंतर्गत तयार करण्यांत आलेले आहे. आणि त्या प्रत्येक प्रकारच्या कच–यावर शास्त्रोक्तपध्दतीने प्रक्रिया करून त्याची विल्हेवाटकरून आणि त्याच्यातुन जे शिल्लक राहिल जे शेपण भुमीमध्ये त्याची विल्हेवाट लावणे अपेक्षित आहे. या संपुर्ण प्रक्रियेचा या नियमाचा अवलंबुन करूनच नागपूर शहरामध्ये निर्माण होणा–या कच–यावर प्रक्रिया केली जाईल. त्याची विल्हेवाट लावण्यांत येईल.

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, साहेबांनी आता सांगीतले कि, कनक बरोबर जो एग्रीमेंट नागपूर महानगरपालिकेनी केला, त्याच्यामध्ये नोंद करण्यांत आलेली आहे कि ओला कचरा व सुखा कचरा वेगवेगळया वाहनातुन घेवून जावयाचा आहे. परंतु आमच्या निदर्शनास असे येत नाही म्हणुन टॉप 10 मध्ये असणारी सिटी ती आता 137 क्रमांकावर गेली आहे. यह यहां बैठे प्रत्येक नगरसेवक पर इस बात का असर है, भले ही सत्तापक्ष के लोग इस बात को नही कह सकते। मा.महापौरजी, लेकिन यह हम सबकी जबाबदारी है और हम सबकी जबाबदारी होने के नाते मुझे ऐसा लगता है कि कही न कही जो एग्रीमेंट कनक से हुआ था या आनेवाली कंपनीयो से जो हमारा एग्रीमेंट होता है उस एग्रीमेंट को फॉलो करने के लिये जो अधिकारीयो की टिम होनी चाहिये कि वह किस तरीके से उस एग्रीमेंट का पालन कंपनी कर रही है या नही कर रही है इस बात को देखने के लिये हमारे पास टिम नही है। और इसलिये हमारे शहर का आज यह हाल है। मैं आपको दुसरा उदाहरण देना चाहती हूॅ, मा.आयुक्त

इस सभागृह मे नये है हम इनका स्वागत करते है। मा.आयुक्त महोदय से हमे बहोत अपेक्षा है।

श्री.मनोज चाफले :— मा.महापौरजी, माझे म्हणणे असे आहे की,

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, मेरा भाषण शुरू है, मा.सदस्य ने पाईंट ऑफ आर्डर नही लिया। त्यांना सांगण्यात यावे.

श्री.मनोज चाफले :— पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.महापौरजी, आपण कचऱ्याच्या प्रोसेसबद्यल जी माहिती घेतली त्यानुसार 700 घनमिटर कचरा उचलण्याची कनकला जी परवानगी आहे, त्याचा करार केलेला आहे त्याच्या व्यतिरिक्त कनक जास्त प्रमाणात कचरा उचलण्याचा प्रयत्न करीत आहे, आपण मागे दौरा केला असता असे लक्षात आले कि त्यांच्याकडे कचरा उचलण्याकरिता गाडयांची व्यवस्था नाही, आपण महानगरपालिकेच्या हेल्थ विभागाच्या माध्यमातुन ज्याप्रकारे नागपूर शहर स्वच्छ व सुंदर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्रीमती आभा पांडे :— पाईंट ऑफ इंन्फार्मेशन, मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका क्या कर रही है और क्या नही कर रही है यह नागपूर महानगरपालिका के प्रशासन मे बैठे हुऐ अधिकारी हमे जवाब देगें। मा.महापौरजी, मैं जो दुसरा उदाहरण देने जा रही हुँ यह दुसरा उदाहरण नागपूर शहर मे एल.ए.टी. कंपनी व्दारा स्मार्ट सिटी अंतर्गत जो फायबर केबल डाले जा रहे है वह फायबर केबल उस संदर्भ मे हर झोन मे लिस्ट चली गयी है कि कितने किलो मिटर किस झोन मे खुदाई होनेवाली है कहां केबल डालने वाले है, कहां पोल लगने वाले है लेकिन मा.महापौरजी इस बात की जानकारी एक भी जनप्रतिनिधी को अभी तक नही पहोंची। मा.महापौरजी, सतरंजीपूरा झोन अंतर्गत 8 कि.मी. तक एल.ए.टी.कंपनीव्दारा फायबर केबल डालने की प्रक्रिया शुरू हुई है, मा.महापौरजी, मेरे प्रभाग मे दो से ढाई माह पूर्व.........

श्री अविनाश ठाकरे :— मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, कृपया मा.सदस्यांनी विषयांतर करू नये. विषयावर बोलावे.

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, ओला कचरा सुखा कचरा, याच्याशी माझा विषय कनेक्टेड आहे. आमचे स्वच्छ नागपूर, सुंदर नागपूर, जर यात काही चुका असतील तर त्या निदर्शनास आणुन देणे ही माझी चुक आहे काय ? हे मला सांगण्यात यावे, नाही तर आम्ही बसुन जातो. आमच्या प्रभागात एल.ए.टी.कंपनीव्दारे जी व्यवस्था आहे ती पाहण्यासाठी तुम्ही आमच्या बरोबर चला। मा. महापौरजी, सिर्फ खडड्े खोदे जाते है, खड्डे खोदकर फायबर केबल डालने के बाद खडड्े जैसे के वैसे रहते है। ठिक है हम सक्रिय है लेकिन अन्य प्रभाग मे जहां पर नगरसेवक को पता नही, कई जगह ऐसी भी होंगी, जहां खडड्े खोद दिये होंगे। लेकिन हमारे प्रभाग मे खडड्े खोदे गये हमने पता किया कौन व्यक्ति है। मा.महापौरजी, मेरा यह कहना है कि ओ.सी.डब्लु. कंपनी जहां देखो खडड्े खोदकर चले जाती है, लेकिन रिस्टोरेशन नही करती, मैं मेरे प्रभाग के 100 खडड्े आपको दिखा सकती हुँ,।

महापौर :— मा.सदस्या, विभाग प्रमुख उभे आहे त्यांना त्यांच्या विभागाचे प्रश्न विचारावे.

श्रीमती आभा पांडे :— मा.महापौरजी, मी कच—याच्या संदर्भातच प्रश्न विचारत होते कि नागपूर शहराची जी अवस्था झालेली आहे त्याचे कारण ज्या कंपनीव्दारे काम सुरू आहे, त्याच्यावर नियंत्रण झोन कार्यालयामार्फत होत नाही, आणि नागपूर महानगरपालिकेच्या केंद्रीय कार्यालयामार्फत ही होत नाही, याची दखल घेण्यांत यावी.

श्री.मनोज चाफले :— मा.महापौरजी, ओला कचरा व सुखा कचरा या विषयाच्या संदर्भात आपण सर्वांनी स्वागत करावे. भारत सरकारकडुन ज्याप्रकारे शहरी विकास मंत्रालयाकडुन जी माहिती आली आहे, ज्या भागामध्ये जे लोक कचरा डस्टबीनमध्ये गोळा करणार आहे ज्या लोकांची ताकद असेल ते घेवु शकतात व ज्या लोकांना खरच त्याची आवश्यकता आहे जे घेवु शकत नाही त्यांना हे डस्टबीन उपलब्ध करून देण्यांत यावे, अशी माझी आपणांस विनंती आहे.

श्रीमती यशश्री नंदनवार :— मा.महापौरजी, हा अतिशय योग्य विषय आहे याबाबत तीन पर्याय प्रशासनाने सुचविलेले आहे. प्रत्येक घरी डस्टबीन देण्यांत यावे. 5.5 लक्ष घरांना एकदा निःशुल्क द्यावे व दुस—यांदा शुल्क घ्यावे. स्लम विभागात हे डस्टबीन निःशुल्क देण्यांत यावे. मला एक प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, या डस्टबीनचे आयुष्य किती असते साधारणतः एक ते दिढ वर्षाचे असेल आपल्या घराचे डस्टबीन दिढ वर्षानंतर दुसरे बदलावे लागते, आपल्याला याच्यावर नियमित खर्च करावे लागणार आहे काय ? त्यामुळे मा.अधिका—यांनी सांगावे कि त्या डस्टबीनचे आयुष्य किती असणार आहे, ते डस्टबीन खराब झाले तर आपल्याला दुसरे डस्टबीन देण्यात येणार आहे काय ?

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :— मा.महापौरजी, आज शहरामधुन घराघरातुन कचरा विगतवारी करण्याची प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्याची सुरूवात व्हावी, 21 मार्च 2017 ला स्वच्छ भारत मिशनचे डायरेक्टर यांनी सर्व देशभरातल्या स्थानिक स्वाराज्य संस्थेला आदेश दिले कि, त्या आदेशानुसार 5 जुन जागतीक पर्यावरण दिनापासुन घराघरातुन कच—याची विगतवारी करण्याची सुरूवात करावयाची आहे. 2 ऑक्टोबर 2014 ला स्वच्छ भारत मिशन हे मा.पंतप्रधान महोदयांनी जाहिर केले, त्या दिवसापासुन सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेला कच—याची शास्त्रोक्तपध्दतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. आजपर्यंत जी व्यवस्था या शहरामध्ये सुरू होवु शकली नाही घराघरातुन कच—याची विगतवारी करणे, ज्याठिकाणी कचरा निर्माण होतो, किंवा जी व्यक्ति कचरा निर्माण करते, त्या व्यक्तिची जबाबदारी आहे कि त्यांनी कच—याची विगतवारी करून तो कचरा स्थानिक स्वराज्य संस्थेला दिला पाहिजे. आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी आहे कि तो कचरा घरा—घरातुन गोळा करून त्याची बंद वाहनातुन वाहतुक करणे ज्यामुळे त्याचे प्रदुषण होणार नाही, अश्या वाहनातुन त्याची वाहतुक करणे आणि त्याच्यावर प्रक्रिया करणे, अश्या तीन प्रकारच्या कचरा कुंडया घरामध्ये उपलब्ध राहिल्या पाहिजे, आपण कोणत्या द्यायचे, हे महानगरपालिकेच्या प्रशासनाने येथे प्रस्तावित केले आहे. साधारण महानगरपालिका क्षेत्रामध्ये घराची संख्या 5 हजार किंवा 6 हजार गृहित धरल्यास अश्यावेळी

आपल्याला दोन स्वतंत्र डस्टबीन द्याव्या लागतील तर आपण काय करावे, किती क्षमतेच्या द्याव्या, प्रशासनाने स्पष्ट केले आहे कि 12 लिटर क्षमतेच्या दोन वेगवेगळया डस्टबीन द्याव्या. पहिल्यांदा सुरूवातीला आपण द्याव्या, भविष्यामध्ये आपण त्या पुरवाव्या, अश्याप्रकारचा विचार मुळ प्रस्तावात करण्यांत आलेला नाही. नंबर दोन आपण मुळ प्रस्तावात सुध्दा पर्याय दिलेले आहे. आपण नागरिकांना मोफत द्याव्या काय ? याबाबत प्रशासनाचा प्रस्ताव असा आहे कि, झोपडपट्टीमधले जे लोग आहे म्हणजे बिलो पॉवरटी लाईन त्यांना मोफत द्याव्या, याबाबत या सभागृहाने तो धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे. आपल्याला यासाठी 10 ते 11 लाख डस्टबीन उपलब्ध करून घ्याव्या लागणार आहे त्याच्या खर्चाचा ॲक्शन प्लॉन आपण तयार केलेला आहे, शासनाने यात आपल्याला 21 मार्च 2017 च्या डयु लेटरप्रमाणे महानगरपालिकेनी स्वतः खरेदी करावे, असे म्हटले आहे.

श्री जुल्फेखार अहमद भुटटो :— मा.महापौरजी, इसमे बिलो पावर्टी लाईन कैसे डिसाईड करेगें।

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :— मा.महापौर महोदया, राज्य सरकारचे, केंद्र सरकारचे दारिद्रय रेषेखाली लोकांकरिता जे नियम आहे, आम्ही मुळ प्रस्तावामध्ये असे म्हटले आहे महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण 239 घोषित झोपडपटट्या आहे व 131 अघोषित झोपडपटट्या आहेत, एकुण 424 झोपडपटट्या आहेत. आणि त्यामध्ये साधारणपणे 1 लाख 40 हजार लोक वास्तव्य करतात. ज्या ज्या घोषित व अघोषित झोपडपटट्या आहेत त्यातल्या 1 लाख 40 हजार लोकांना आपण मोफत डस्टबीन पुरवु शकतो. परंतु ज्या लोकांची क्षमता आहे त्या लोकांकडुन खरेदी करण्यासाठी आलेला दर वसुल करू शकतो.

श्री जुल्फेखार अहमद भुटटो :— मा.महापौरजी, लोगो की क्षमता आप कैसे डिसाईड करेगें।

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :— मा.महापौरजी, महानगरपालिका क्षेत्रात घोषित व अघोषित झोपडपटट्यामध्ये राहणा—यां लोकांची संख्या निश्चित झालेली आहे. दारिद्रयरेषेखाली कोण हे ठरविणे प्रशासनाला सहज शक्य आहे.

श्री नितीश ग्वालबंसी :— मा.महापौरजी, जो झोपडपटट्या घोषित, अघोषित है उसकी यादी मा. सदस्यों को देना चाहिये, यह आपसे निवेदन है।

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :— मा.महापौरजी, अश्याप्रकारची यादी उपलब्ध आहे, आणि ती निगम सचिवांना देण्यांत येईल, त्यांच्यामार्फत ती यादी वितरणाची व्यवस्था आपण करू शकतो.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, या शहरामध्ये दोन संस्था कार्यरत आहे. एक महानगरपालिका व दुसरी नागपूर सुधार प्रन्यास, परंतु बिल्डींग बॉयलाजनुसार आपण मोठ—मोठया इमारतीचे नकाशे मंजूर करतो त्यांचा कचरा कोण घेणार आहे त्यांचे डिस्पोजल कुठे जाणार आहे. ज्या वसाहती शहरामध्ये भरपूर भरलेले व काही रिक्त प्लॉट आहे त्या प्लॉटवर कचरा पडतो, त्या भुखंड

मालकावर काय कार्यवाही करणार आहे. तसेच जे ड्रेनेजच्या खुल्या खडड्यामध्ये कचरा टाकतात त्यांच्यावर कोणती कार्यवाही करणार आहे. याच्यात सामाजिक संस्थेचे किती लोक लागणार आहे याचा जर खुलासा झाला तर चांगले होईल. स्वच्छतेच्या संदर्भात देशामध्ये जो प्रथम शहर आलेला आहे इंदौर त्या शहराचे महापौर नागपूरमध्ये आले त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सांगीतले कि, आम्ही इतक्या कर्मचा–यांना निलंबित केले, इतक्या नागरिकांवर दंड लावला, लोकांनी आम्हाला या कामात सहकार्य केले त्यामुळे आमचे शहर प्रथम क्रमांकावर आले. या संदर्भात आपण कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहे. नागपूर शहर स्वच्छ सुंदर झाला पाहिजे हा चांगला प्रस्ताव आहे. याला मंजूरी मिळाली पाहिजे परंतु या गोष्टीचा खुलासा झाला तर बरे होईल.

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :– मा.महापौरजी, या शहरामध्ये नियोजनासाठी दोन प्राधिकरणे असतील नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका तरी देखील घनकच–याचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. आणि महानगरपालिका क्षेत्रात राहणा–या सगळया नागरिकांच्या घरातुन गोळा होणा–या कच–याची विगतवारी करण्याची जबाबदारी आपली आहे.

श्री अभय गोटेकर :– मा.महापौरजी, स्लम वस्त्यामध्ये राहणा–या लोकांचे दहा बाय दहाचे घर असतात, त्या घरामधुन खूप कचरा निघत नाही. आणि दुसरीकडे जे मोठ–मोठे बंगल्यात राहतात त्यांच्या बंगल्यामधुन खूप कचरा निघतो, आपण त्यांच्याकडुन टॅक्सच्या माध्यमातुन पैसे घेतले तर महानगरपालिकेवर भुर्दंड लागणार नाही, लहान लहान घरात छोटे व मोठया घरात मोठे डस्टबीन दिले तर महानगरपालिकेवर जास्त भर पडणार नाही.

श्री नितीश ग्वालबंसी :– मा.महापौरजी, कितने डस्टबीन नागपूर शहर मे लगाये जायेगे इसको उठाने के लिये कितने कर्मचारी काम करेगें, इस बात की जानकारी हमे दी जाये।

अपर आयुक्त (श्री सोनवने) :– मा.महापौरजी, आज शहरामध्ये साधारणतः 1500 कर्मचारी काम करीत आहे त्यापेक्षा जास्त कर्मचारी लावण्याची आवश्यकता राहणार नाही, आपल्याकडे कर्मचारी व वाहनाची जी व्यवस्था आहे ती पुरेशी आहे.

श्रीमती भावना लोणारे :– मा.महापौरजी, माझया प्रभागात स्लम एरीया आहे, तेथुन दररोज कचरा उचलण्यासाठी कनक रिर्सोसेसची गाडी येत नाही, आपण कनकला कचरा उचलण्याचा ठेका दिलेला आहे. त्यांना कचरा उचलण्यासाठी वारंवार फोन करावा लागतो, लोक माझ्या घरी येवुन सांगतात कि कचरा उचलणारा येत नाही, मग लोक आपल्या घराचा कचरा रस्त्यावर टाकतात, आपण याबाबत कनक कंपनीवर कोणती कार्यवाही करणार आहे.

श्री नितीश ग्वालबंसी :– मा.महापौरजी, मेरे प्रभाग मे 26 कर्मचारी है और 70 हजार की

लोकसंख्या है, यह बात न्यायसंगत है क्या फिर कैसे कचरा उठेगा। आज हम 137 वे नंबर पर आ गये है, हमारे प्रभाग मे कनक के कर्मचारीयो ने रहना चाहिये, जब उनके मनमे आता है वह कचरा उठाते है, एक हफते मे एक घर मे कितने बार गाडी जाना चाहिये।

अपर आयुक्त (श्री सोनवणे) :– मा.महापौरजी, हा विषय धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आहे. सॅगरीगेशन ऑफ सोर्स करण्यासाठी दोन वेगवेगळया रंगाच्या कचराकुंडया ठरवावयाच्या आहे, त्याचा सभागृहाने निर्णय घ्यावा, सभागृहात मा.सदस्यांनी कच–याच्या संदर्भात जी भुमिका व्यक्त केली कि कचरा उचलण्यात येत नाही, त्याची दखल घेण्यांत येईल, महानगरपालिकेचे सहा.आयुक्त लक्ष देतील, महानगरपालिकेच्या कर्मचा–यांकडुन जो कचरा उचलण्यात येतो व कनक रिर्सोसेस कंपनीकडुन जो कचरा उचलण्यात येतो त्यांच्याकडे वेळोवेळी लक्ष देण्यांत यावे.

श्री. संदिप जोशी :– मा.महापौरजी, या विषयावर अत्यंत चांगली चर्चा याठिकाणी झाली, श्री भुटटोजी असतील, जमाल भाई असतील, आभाताई पांडे असतील, बनकर ताई आहे, त्याचप्रमाणे मनोज सांगोळे, मनोज चाफले, अभय गोटेकर, श्री हरीश ग्वालबंसी या सर्वांनी याठिकाणी अत्यंत चांगली चर्चा केलेली आहे. एक अत्यंत चांगला प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे. तुमच्या आमच्या सर्वांच्या मनाची स्वच्छ नागपूर सुंदर नागपूरबद्यलची कळकळ देखील प्रामाणिक कळकळ आहे आज 74 पैकी 20 वा नंबर नागपूरचा होता आणि आता 434 पैकी 137 वा नंबर नागपूर शहराचा झालेला आहे. आणि त्याच्यामुळे नगरसेवक म्हणून असेल, अधिकारी, प्रशासन असेल निश्चितच तुम्हाला आम्हाला हे वाटणे स्वाभाविक आहे, ही कळकळ या सभेच्या माध्यमातुन याठिकाणी व्यक्त झाली आहे. आणि हा आता जो संपुर्ण प्रस्ताव आलेला आहे. 5500 घरांना डस्टबीन फ्री मध्ये द्यायचे कि स्लम भागांना डस्टबीन फ्री द्यायचे या पध्दतीने तीन टप्प्यामधील हा संपुर्ण प्रस्ताव आहे, माझी सभागृहाच्या माध्यमातुन आपल्याला विनंती आहे कि, यामध्ये कुठल्याही पध्दतीचा भेदभाव न करता स्लमला फ्री द्यायचे कि एक विकत द्यायचे असा निर्णय न घेता संपुर्ण शहरातील सर्व घरांना दोन डस्टबीन फ्री मध्ये देण्यांत यावे. हे सर्व होत असतांना यशश्री नंदनवार यांनी देखील एक अत्यंत चांगला विषय याठिकाणी ठेवला कि डस्टबीनचे आयुष्य किती राहिल अन्यथा शासकीय व्यवहारामधे हे लक्षात यायचे कि ते डस्टबीन आपण द्यायचे व तिस–या महिन्यात ते डस्टबीन तुटले. आणि ही जबाबदारी कोणाची आहे आणि त्याच्यामुळे केवळ लिटरचा विचार न करता, याचा वजन किती आहे, याचा गेज किती आहे याचा देखील विचार करून हे डस्टबीन चार वर्ष टिकले पाहिजे, त्याची सवय झाली पाहिजे आणि त्यानंतर य शहराच्या नागरिकांना स्वतःच्या किमतीवर, स्वतःच्या हिमतीवर, स्वतःच्या पैश्याने डस्टबीन घेण्याची व्यवस्था निर्माण केली पाहिजे. आपण ही व्यवस्था उभी नाही केली तर पुन्हा दोन वर्षानंतर महानगरपालिकेला 14–15 कोटी रूपयांचे डस्टबीन देण्याची व्यवस्था उभी करावी लागेल. हे होत असतांना या शहरामध्ये अनेक प्रतिष्ठित संस्था आहे, या शहरामध्ये अनेक कंपनी अश्या आहेत कि ज्या सी.एस.आर.मध्ये स्वच्छ भारत मिशन अभियानामध्ये मदत करीत आहे. माझी मा.महापौरांना विनंती आहे कि त्यांनी या संस्थाना दोन तीन दिवसामध्ये आव्हान करावे, या डस्टबीनमधला काही भाग, काही सहभाग त्यांनी देखील उचलावा, दोन तीन करोड रूपयांचा सहभाग त्यांनी उचलावा, या शहरामध्ये खासदार देखील आहे,

या खासदाराना देखील त्यांनी विनंती करावी, त्यांच्या निधीमधुन त्यांनी काही न काही पोर्शन या 14 कोटी मध्ये टाकावे, या शहरात आमदार आहे, त्या आमदारांना देखील आपण विनंती करावी कि आपण आपल्या भागातील डस्टबीनकरीता पांच लक्ष रूपये द्यावे, पांच लक्ष रूपये देणे याचा अर्थ दोन हजार डस्टबीन त्यांच्या माध्यमातुन झाले, प्रसंगी हे सभागृह आमदार असतील, खासदार असतील, माझी सभागृहामधल्या नगरसेवकांना विनंती आहे कि 1 लक्ष रूपयात 400 डस्टबीन येतात, आणि त्यामुळे कुठे तरी स्थायी समिती अध्यक्षांनी याच्यावर विचार करून बजेट लवकरच येत आहे, त्यामुळे वार्ड निधीमधुन एक लाखापर्यंतचे डस्टबीन, दोन लाखापर्यंतच्या डस्टबीन नगरसेवकांनी घ्याव्या आणि त्यावर नगरसेवकांचे नांव टाकुन त्या त्या भागामध्ये हे डस्टबीन नागरिकांना देण्यांत याव्या, या प्रोव्हीजनला याठिकाणी सभागृहाने मान्यता द्यावी, रहिवाशी घरांना दयावयाच्या डस्टबीनची आवश्यकतेनुसार डीजीएस ॲण्ड डी दरानुसार खरेदी करण्यासाठी प्रशासनाने प्रथमतः संस्था निश्चित करून त्यासाठी स्थायी समितीच्या मंजूरीने विनानिविदा खरेदी कराव्यात व त्यासाठी सन 2017—18 च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी. आणि त्याशिवाय या शहरात अनेक नागरिक असे आहेत ज्यांना 2500 रूपयांचे डस्टबीन घेणे काही फार मोठी गोष्ट नाही, ते सहज 2500 रूपयांचे डस्टबीन घेवु शकतात, या लोकांना या डस्टबीन घेण्यासाठी आव्हान करावा आणि नागपूर महानगरपालिकेतर्फे या सर्व नागरिकांना गौरवान्वित देखील करण्यांत यावे, त्यांनी या पध्दतीने स्वतःकरिता शहर स्वच्छ ठेवण्याकरिता स्वतःचा सहभाग दाखविलेला आहे आणि त्याच्यामुळे आपण सर्वांनी या विषयाला या पध्दतीने मंजूरी द्यावी.

वरील चर्चेनंतर मा सदस्यांच्या चर्चेचा मानस लक्षात घेता उपरोक्त प्रस्ताव सभागृहाने विचारात घेवून संपुर्ण शहरातील रहिवासी घरांना 2 डस्टबीन निशुल्क देण्यात यावे. त्याचप्रमाणे शहरातील आर्थिकदृष्टया सक्षम नागरिकांनी स्वतःच्या पैश्याने या डस्टबीन विकत घेण्याकरिता त्यांना आवाहन करण्यात यावे आणि तशी व्यवस्था प्रशासनाने निर्माण करावी. तसेच शहरातील अनिवासी वापराकरिता लहान मोठया व्यावसायिकांना/प्रतिष्ठित संस्था/ कंपन्या/ यांना सशुल्क वितरीत कराव्यात आणि शहरातील खासदार, आमदार आणि नगरसेवकांनी या डस्टबीनच्या खरेदीकरिता आणि वितरणाकरिता आपल्या स्वेच्छा निधीतून हयाकरिता जास्तीतजास्त निधी उपलब्ध करून दयावा आणि शहरातील प्रतिष्ठित संस्था /कंपन्या/ व्यावसायिक प्रतिष्ठाणे यांनी त्यांच्या सीएसआर निधीतून उपलब्ध होण्याकरिता प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात यावे, रहिवाशी घरांना दयावयाच्या डस्टबीनची आवश्यकतेनुसार डीजीएस ॲण्ड डी दरानुसार खरेदी करण्यासाठी प्रशासनाने प्रथमतः संस्था निश्चित करून त्यासाठी स्थायी समितीच्या मंजूरीने विनानिविदा खरेदी कराव्यात व त्यासाठी सन 2017—18 च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करण्यात यावी. या मा.सत्तापक्ष नेता श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 27:—**</u> "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर विविध विकास प्रकल्प राबविण्यास सभागृहाची मान्यता प्रदान करणे.

महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयात विविध प्रयोजनासाठी आरक्षीत जमिनी महापालिकेने संपादीत केले असून सदर जमिनीचा विकास निधी अभावी करणे शक्य झालेले नाही त्यामुळे अशा आरक्षीत जमिनीचा विकास " बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर करणे प्रस्तावीत आहे.

सद्यास्थितीत खालील प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (**Detailed Project Report**) सल्लागांरामार्फत तयार करण्यात आले आहेत.

1. बुधवार बाजार सक्करदरा येथे बाजारासह शॉपिंग मॉलची निर्मिती.
2. सोख्ता भवन गांधीबाग येथे सांस्कृतिक सभागृह व कमर्शिअल कॉम्प्लेक्सचा विकास.

याशिवाय खालील प्रकल्पांचे व्यवहार्यता अहवाल (**Feasibility Report**) आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (**Detailed Project Report**) सल्लागांरामार्फत तयार करण्यात येत आहेत .

1. बाबुलाखेडा रामेश्वरी येथे भाजीपाला बाजार आणि शॉपिंग संकुलाचा विकास करणे.
2. मौजा वाठोडा येथे शॉपिंग कॉम्प्लेक्सचे निर्माण.
3. बुधवार बाजार केळीबाग रोड महालचा विकास.
4. धरमपेठ **VIP Road** येथे डिग दवाखान्याचे निर्माण.
5. क्वेटा कॉलोनी देवडीया मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे निर्माण.

सल्लागांरामार्फत तयार करण्यात आलेले सविस्तर प्रकल्प अहवाल (**Detailed Project Report**) आणि तयार करण्यात येणारे व्यवहार्यता अहवाल (**Feasibility Report**) विचारात घेवून सदर प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर राबविण्यास सभागृहाची मान्यता प्रदान करणे आणि प्रकल्प अंमलबजावणी साठी आयूक्तांना प्राधीकृत करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक 28**:– मा. न्यायालयात म.न.पा. ठराव क्र. 255 दि. 16.07.2014 विरुद्ध याचिका दाखल असल्यामुळे व त्याला स्थगनादेश असल्यामुळे म.न.पा. ठराव क्र. 255 रद्द करुन पदोन्नतीकरिता मलवाहक जमादार/एम.एस.डब्ल्यु/एस.एफ.डब्ल्यु./किटक संग्राहक एकूण 261 पदे ही आरोग्य विभागातील 10 वर्ग उत्तीर्ण व त्यापेक्षा शिक्षित सफाई कर्मचाऱ्यांसाठी व हवालदार/मिटर रिडर/मोहरीर/कर संग्राहक व कनिष्ठ लिपीक एकूण पदे 398 ही आस्थापना विभागातील वर्ग–4 मधील 10 वर्ग उत्तीर्ण व त्यापेक्षा शिक्षित कर्मचाऱ्यासाठी पदोन्नतीसाठी ठेवण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून प्रशासनाने दिलेल्या सुचनेनुसार प्रस्तावात नमूद म.न.पा. ठराव क्र. 255 मध्ये रद्द या शब्दाऐवजी सुधारणा व मलवाहक जमादार या पदाचे पदोन्नती बाबतचे यापूर्वीचे सर्व ठराव अधिक्रमीत करून पदोन्नतीकरिता वेतनमान 5200–20200 ग्रेड पे 1900 मधील मलवाहक जमादार/एम.एस.डब्ल्यु/एस.एफ.डब्ल्यु./किटक संग्राहक एकूण 261 पदे ही आरोग्य विभागातील 10 वर्ग उत्तीर्ण व त्यापेक्षा शिक्षित सफाई कर्मचाऱ्यांसाठी व हवालदार/मिटर रिडर/मोहरीर/कर संग्राहक व कनिष्ठ लिपीक एकूण पदे 398 ही आस्थापना विभागातील वर्ग–4 मधील 10 वर्ग उत्तीर्ण व त्यापेक्षा शिक्षित कर्मचाऱ्यासाठी पदोन्नतीसाठी ठेवण्यास मान्यता प्रदान करावी. या मा.सत्तापक्ष नेता श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात येतो या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक 29**:– हॅजर बायोटेक कंपनी नी केलेल्या कामाबद्दल (अग्रीमेंट) व विजेच्या बिल बद्दल सखोल चर्चा करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीसवर सभागृहात चर्चा नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्याकरिता हॅजर बायोटेक या कंपनीला काम देण्यात आले होते. मा. महापौरजी, 13 फेब्रुवारी 2009 ला त्यांना काम देण्यात आले आणि एक एग्रीमेंट त्यांच्याबरोबर करण्यात आले 15 एप्रिल 2009 ला मला प्रशासनाला येथे विचारायचे आहे या कंपनीने एग्रीमेंट नुसार काम केलेले आहेत काय ?

महापौर :– विभाग प्रमुखांनी माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, हॅजर कंपनीला करारनाम्यानुसार 600 मॅट्रीक टनावरती प्रक्रीया करायची होती परंतु त्या कंपनीच्या प्लांन्टमध्ये आग लागल्यामुळे त्याची कॅपॅसिटी कमी झाली त्याच्यामुळे 150 मॅट्रीक टनापर्यत त्याला सिमित करण्यात आले आणि करारनाम्याप्रमाणे त्यांनी प्रक्रीया पुर्ण न केल्यामुळे त्या कंपनीला 1 कोटी 64 लक्ष रुपयांचा दंड प्रशासनामार्फत करण्यात आला आहे.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, म्हणजेच करारनाम्यानुसार त्या कंपनीने काम केलेले नाही असे तुम्ही म्हणतात. 600 मॅट्रीक टन कचऱ्यावर त्याला दररोज प्रोसेस करायची होती आणि तो प्रोसेस करण्याकरिता असमर्थ आहे असे दिसले म्हणुन तुम्ही जे त्यांना शोकॉज दिला, त्याच्यानंतर 1 कोटी 64 लक्ष रुपयांचा जो फाईन लावला तो केव्हा पासुन केव्हा पर्यत लावला.

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, 29–10–2013 ते 26–10–2014 या वेळी कंत्राटदाराला 25,000 रुपये प्रति दिवसाप्रमाणे दंड करण्यात आला तसेच 27.10.2014 ते 20 जानेवारी 2015 पर्यत 50,000 रुपये प्रति दिवसाप्रमाणे दंड करण्यात आला आहे.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, 25,000 प्रति दिवस दंड लावण्यात आला आणि 27 ऑक्टोंबर 2014 ते 20 जानेवारी 2015 पर्यत 50,000 रुपये प्रति दिवसाप्रमाणे दंड लावण्यात आला आणि त्याच्यानंतर 2015 ते 2017 पर्यत या कंपनीने 600 मॅट्रीक टन कचऱ्यावर दररोज प्रोसेस केली आहे काय ?

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, नाही त्यांनी आग लागल्यानंतर प्रति दिवस 200 मॅट्रीक टन कचऱ्यावर प्रोसेस केली आहे.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, म्हणजेच मा.महापौरजी, 2015 पासुन 2017 पर्यत प्रत्येक दिवशी त्यांनी 400 मॅट्रीक टन कचऱ्यावर प्रोसेस केली नाही.

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, प्रशासनाने त्याला आदेश दिले होते की त्याची कॅपीसीटी 200 मॅट्रीक टन झालेली आहे असे कळविण्यात आले.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, प्रशासनाने त्यांना काय आदेश दिले होते ते सोडा, प्रशासनाने एग्रीमेंट पण केला होता एग्रीमेंट केल्यानंतर त्याचे विजेचे बिल कोणी भरले ते विजेचे बिल नागपूर महानगरपालिकेने भरले होते काय ?

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, होय भरले होते.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, म.न.पा.नी त्या कंपनीचे विजेचे बील किती रूपयांचे भरले होते.

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, 66 लक्ष रुपये विजेचे बिल भरले होते आणि पाण्याचे देयकाची रक्कम होती टिपींग फीची त्यातुन ती वजा करण्यात आलेली आहे.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, हॅजर कंपनीला जे काम करायचे होते ते त्यांनी सुरुवातीपासुन केलेली नाही. एग्रीमेंटमध्ये ते नमुद आहे काय की त्यांना नागपूर महानगरपालिके तर्फे एक पोकलॅन्ड देणार आहे.

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, त्यांना मशीनरी देण्याचे प्रस्तावित नाही.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, तेथे एक पोकलॅन्ड आहे ते नागपूर महानगरपालिकेचे आहे. जेव्हा पासुन त्या कंपनीने काम घेतलेले आहे तेव्हा पासुन म.न.पा.ने त्यांना पोकलॅन्ड दत्तक दिलेले आहे. मा.महापौरजी मै जो पिछले विषय मे कह रही थी किसी भी कंपनी के साथ जब हम एग्रीमेंट करते है उस एग्रीमेंट का पालन सही तरीके से हो रहा है या नही इस बात की ओर ध्यान देने वाला कोई नही है। मेरा यह कहना है जब 2013 से उस कंपनीने काम ही नही किया तो हम उसका इतना लाड क्यों कर रहे है। मैने एक बहुत अच्छा प्रश्न प्रशासन से पुछा की या प्रोजेक्टचे इलेक्ट्रीक बिल आणि पाण्याचे बिल कोण भरत होते तर मला प्रशासनाने खुप सुंदर उत्तर दिले हॅजर बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे इलेक्ट्रीक बिल कंपनीच भरत आहे मध्यंतरी इलेक्ट्रीक बिल भुगदान करण्याची कंपनीची जर क्षमता नसली तर मग सगळेच बिल आपणच भरणार आहे काय ? त्यांनी शास्ती सुध्दा भरलेली नाही, त्या कंपनीवर झालेला फाईन सुध्दा महानगरपालिकेत जमा केलेला नाही. आज नागपूर महानगपालिका की आर्थिक हालत बेहद नाजुक है। उसके बावजुद भी कंपनी की यह कारगुजारी हम धोते रहेंगे तो नागपूर महानगरपालिका हम कैसे चलायेंगे। मा.महापौरजी, इसी विषयपर मै प्रकाश डालना चाहती हुॅ, जो एग्रीमेंट नागपूर महानगरपालिकाने उस कंपनी के साथ किया त्याच्यामध्ये असे लिहले आहे की आधीचा जो कचरा होता त्याला तो पहिले क्लोज करायचा होता त्याच्यानंतर 10 वर्षाकरिता हे मेंटेन करायचे होते, मी येथे प्रशासनाला विचारु इच्छिते की क्लोजर वर्क त्या कंपनीने पुर्ण केलेले होते काय ?

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, क्लोजर वर्क त्यांनी पुर्ण केले आणि जे काम केले त्याचे भुगदान देखील केलेले आहे.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, क्लोजर वर्क जर त्यांनी पुर्ण केलेले आहे त्याच्यानंतर ते मेंटेन करण्याकरिता त्यांनी फक्त आगीचे उदाहरण देवुन प्रशासनाला सांगितले की आमची कॅपॅसिटी नाही आम्ही चालवु शकत नाही आम्ही फक्त 200 मॅट्रीक टनावर प्रोसेस करु शकतो तर मा.महापौरजी, कोई भी कंपनी आ रही है और बता रही है की हमारी कॅपॅसिटी नही है 600 मॅट्रीक टन पर होनेवाला प्रोसेस 200 मॅट्रीक टन पर आ गया 2015 के बाद उसपर नागपूर महानगरपालिका मे काई भी फाईन नही किया, मा.महापौरजी मै यह कहना चाहती हुॅ

अगर उसने अपना काम पुरा नही किया है तो हॅजर बायोटेक कंपनी को कंम्प्लीशन सर्टीफिकेट नागपूर महानगरपालिकाने दिया क्या ?

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, कंप्लीशन सर्टीफिकेट अजुन दिलेले नाही.

श्रीमती आभाताई पांडे :– मा.महापौरजी, 2009 मे उस कंपनी को काम देने के बाद सबसे पहले उन्हे क्लोजर वर्क करना था वहा जो कचरा था उसपर प्रोसेस करना था बाद मे 10 साल तक उसको मेंटेनन्स करना था। इनका कहना है की उसने किया तो इन्होने उस कंपनी को कंम्प्लीशन सर्टीफिकेट नही दिया। क्यु नही दिया इस का कारण बताइयें । मा.महापौरजी यह दृश्य इस शहर का है इसलिये हम 137 स्थान पर आये है।

कार्यकारी अभियंता (चौगंजकर) :– मा.महापौरजी, ऐसा नही है अभी भी काम शुरु है।

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन अति आयुक्त श्री.सोनवणे साहेबांना उत्तर देण्यास सांगावे.

महापौर :– अति.आयुक्त श्री.सोनवणे यांनी उत्तर दयावे.

अति.आयुक्त श्री.सोनवणे :– मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी सभागृहात जे काही निवेदन केले ते निवेदन आणि मेसर्स हॅजर बायोटेक कंपनीव्दारे काम करीत असतांना त्याच्यामधील त्रुटी पाहता हा करारनामा रद्य करणे आवश्यक होते परंतु त्यानंतर प्रश्न निर्माण झाला असता शहरामध्ये जो कचरा निर्माण होतो त्या कचऱ्याचे करायचे काय ? आणि जे पर्यावरण विषयक कायदे आहे त्या कायद्यांतर्गत नॅशनल ग्रीन ट्रीब्युनलकडे एक याचिका दाखल झाली होती त्या याचिकेमध्ये महानगरपालिका प्रशासनानी या हॅजर बायोटेकच्या प्रकल्पाबद्यल पुर्णपणे माहिती दिली प्रकल्प कार्यान्वीत झाल्यापासुन प्रकल्प कशाप्रकारे कार्यरत होता, प्रकल्प का बंद पडला त्याची कारणमिमांसा केली आणि त्यानंतर तो प्रकल्प फक्त 200 मॅट्रीक टन प्रतिदिन पर्यतच चालविता येवु शकतो हे जेव्हा निर्देशनास आले त्यावेळेस राष्ट्रीय हरीत लवादाच्या पुणे बोर्डच्या निर्णयानुसार 200 मॅट्रीक टन प्रतिदीन ऐवढया कचऱ्यावरती प्रक्रीया केली जाते. म्हणुन या प्रकल्पासाठी जे विद्युत देयके येते ते महानगरपालिका प्रशासनाने भरण्याचा निर्णय घेतला याचा अर्थ ती संपुर्ण जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाने घेतली असे नाही तर ते 200 मॅट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रीया केल्यानंतर त्यांना जे काही देयक टीपिंग फी आहे या देयक टिपींग फि मधुन आम्ही आतापर्यत 66 लाख 24 हजार रुपये हे जे देयक दिले आहे ते देयक त्यांच्या रनिंग बिलामधुन वजा करुन घेतले. हा प्रकल्प 200 मॅट्रीक टन क्षमतेवर जर चालला तर निदान 200 मॅट्रीक टन कचऱ्यावरती तरी प्रक्रीया करणे प्रशासनाला शक्य होणार होते अन्यथा साधारणपणे 1000 ते 1100 मॅट्रीक टन प्रतिदिन कचरा निर्माण होतो तो पुर्ण कचरा

हा अशास्त्रीय पध्दतीने तेथे डंम्प झाला असता. आजही वस्तुस्थिती अशी आहे की 1100 मॅट्रीक टन जो शहरामध्ये कचरा निर्माण होतो त्यापैकी फक्त 200 मॅट्रीक टनवरती प्रक्रीया करु शकतो हॅजरचा प्रोजेक्ट चालु आहे म्हणुन, नाही तर ते शक्य झाले नसते. राष्ट्रीय हरीत लवादाच्या निर्णयानुसार हा प्रकल्प आज कार्यरत आहे. त्यानंतर आता जो नव्याने करार केला त्यानुसार 800 मॅट्रीक टनवरती प्रक्रीया करुन त्यावरती विज निर्मिती करण्यांत येणार आहे. दरम्यानच्या काळात भांडेवाडी येथील डंम्पींग यार्डवर आपण शास्त्रीय पध्दतीने विंड्रोज फार्म केल्या त्याच्यावरती जे.ई. नावाचे एक कल्चर टाकले भांडेवाडी मधल्या दोन ज्या प्रमुख समस्या होत्या त्या सुटल्या त्या कच–यांपासून जी दुर्गंधी येत होती ती बंद झाली आणि दुसरी समस्या जी होती तेथे ज्या काही माश्या आणि इनसेट निर्माण होत होते ते बंद झाले. फक्त कचऱ्याला आग लागण्याचे प्रमाण जे आहे त्याच्यावरती अजुन पुर्णपणे नियंत्रण मिळाले नाही परंतु सद्या या हॅजरचा प्रकल्प जो चालु आहे तो राष्ट्रीय हरीत लवादाच्या निर्णयानुसार असल्यामुळे तो करारनामा पुर्णपणे रद्य करणे प्रशासनाला शक्य होणार नाही.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी साहेब जे बोलत आहे कि, भांडेवाडी येथील दुर्गंधी बंद झाली भांडेवाडी मध्ये आपण माझ्या सोबत चाला आणि त्या ठिकाणी उभे रहा त्या ठिकाणी माणुस उभे राहु शकत नाही इतकी वाईट परिस्थिती त्या ठिकाणी आहे आणि इतकी वाईट परिस्थिती त्या ठिकाणी असतांना आपण खोटी माहिती सभागृहाला देवु नका, सभागृहाची दिशाभुल करु नका.

अति.आयुक्त (श्री.सोनवणे) :– मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी गंभीर आरोप माझ्यावरती केला मी या सभागृहाला सांगु इच्छितो की कोणत्याही प्रकारे खोटी, दिशाभुल करणारी माहिती माझ्याकडुन सभागृहाला कधीही दिली जाणार नाही. अलमित्रा पटेल विरुध्द केंद्र सरकार यात रागिनी पटेल यांना सल्लागार म्हणुन नियुक्त केले आणि त्यांच्या सल्याने भांडेवाडी येथे सन 1966 पासुन जो कचरा डंम्प करण्यात येत होता तो साधारणपणे 6 लाख मॅट्रीक टन कचऱ्याचा ढिग पडलेला होता त्या ढिगाच्या ऐवजी तेथे विंड्रोज तयार केल्या. आपल्या जे.सी.बी. मशीन आणि पोकलॅन्ड मशीनचा वापर करुन तेथे विंड्रोज केल्या त्या विंड्रोज केल्यानंतर त्याच्यावरती जे.ई. कल्चर नावाचे एक कल्चरची फवारणी केली आणि ती फवारणी केल्यानंतर आपण जे म्हणत आहे की आपण माझ्या सोबत चलावे. मी एकटाच नाही, मी व मा.आयुक्त आमचे अधिकारी वेळोवेळी भांडेवाडी कचरा डेपोला भेट देतो आणि आता देखील माझी तेथे भेट दयायला काही हरकत नाही.

श्री.दुनेश्वर पेठे :– मा.महापौरजी, तेथे दर आठवडयाला आग लागते आणि त्या ऐरियामध्ये कमीत कमी 4 ते 5 कि.मी च्या रेडीयस मध्ये उभे राहु शकत नाही आणि आपले साहेब सांगत आहे की तेथे आम्ही प्रोसेस केली त्या कचऱ्याचा विल्हेवाट केली. तुम्ही दौरा घ्या त्याच्यासोबत महापौरजी आपण आणि आयुक्त साहेब तुम्ही तेथे राहणारे लोक कशाप्रकारे राहतात कसे जगतात ते ॲक्चुअल तुम्ही पाहुन घ्या. तेथील कचरा शहरात चारही दिशेला घेवुन जाणार होते

ते काम झाले नाही. त्याच्यानंतर त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी हॅजर कंपनी आणली त्या कंपनीने काही केले नाही. महानगरपालिकेच्या पैशाचे सर्व नुकसान झाले, तेथे राहणाऱ्या लोकांची परिथिती आपण पहाल तर तेथे उभे राहु शकत नाही, तुम्ही तेथे येवून पहा. त्याठिकाणी येण्याआधी आपल्यासाठी हॉस्पिटलमध्ये बेड तयार ठेवा, तुम्हाला कोणत्या हॉस्पिटलमध्ये जावयाचे आहे, आजपर्यंत जे जे महापौर झाले ते सर्व हुशार होते, तुम्ही पण वेल–अज्युकेटेड आहे, त्याठिकाणी सगळे काम पुर्ण करावे.

वरील चर्चेनंतर हॅजर बायोटेक कंपनी नी केलेल्या कामाबद्दल (अग्रीमेंट) व विजेच्या बिल बद्दल सखोल चर्चा करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवुन मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेचा मानस लक्षात घेता मा.आयुक्तांनी हया भागाचा दौरा करुन हा प्रश्न मार्गी काढावा या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेसह नोटीसची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

<u>ठराव कमांक 30 :–</u> नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्यास सभागृहाने मंजूरी प्रदान केली.

1. म.न.पा. साधारण सभा दिनांक 20.03.2017 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित साधारण सभा दिनांक 20.03.2017 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **महापौर** |
| **नागपूर महानगरपालिका,नागपूर** | **नागपूर महानगरपालिका,नागपूर** |